बुधवार, ५ एप्रिल २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२१३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 5 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-213 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# दंगलखोरांना अद्दल घडवणारच : ममता बॅनर्जी

आधुनिक केसरी न्यूज

**कोलकत्ता : पश्चिम बंगालमध्ये रामनवमीच्या दिवशी अनेक ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडल्या होत्या. यामध्ये मोठ्या प्रमाणात नुकसानही झाले. दरम्यान यावरून भाजपा आणि तृणमूल कॉंग्रेसमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहे. मंगळवारी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दंगल प्रकरणी जबाबदार असणाऱ्यांना अद्दल घडवणार असल्याचा इशारा दिला आहे. ही आपल्या राज्याची संस्कृती नाही, असेही ममता बॅनर्जी यांनी सांगितले.**

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना बॅनर्जी म्हणाल्या की, बाम (डावे) आणि राम (भाजपा) आमच्याविरोधात एकत्र आले आहेत. रामनवमीदिवशी हिंसाचार करून भाजपा रामाचे नाव बदनाम करत आहे. हुगळी आणि हावडा येथील दंगलीमागे भाजपाचा हात आहे. बंगालमध्ये दंगल घडवण्यासाठी अन्य राज्यांतून 'गुंड' आणले होते. एका समाजाला दुसऱ्या समाजाविरुद्ध उभे करत हिंदू धर्माला बदनाम करण्यात येत आहे. दंगल करणाऱ्यांना धर्म नसतो, ते फक्त राजकीय पक्षाचे 'गुंड' असतात. सर्वांना शांतता राखण्याचे आवाहन करते, असे ममता बॅनर्जी यांनी म्हटले. बिहारमध्ये भाजपा सत्तेत आल्यावर दंगलखोरांना उलटे टांगू, असे गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले होते. याचा दाखला घेत ममता बॅनर्जींनी सांगितले, बिहारमध्ये पक्ष सत्तेवर आल्यावर दंगलखोरांना उलटे टांगू, असे भाजपाने म्हटले. मग बंगालमध्ये दंगल घालणाऱ्या तुमच्या गुंडांना उलटे का टांगत नाही? आपल्या घरातूनच कारवाईला सुरुवात व्हावी.





## पोलिसाच्या प्रसंगावधनाने वाचले ५० भाविकांचे प्राण

आधुनिक केसरी न्यूज

**ओंकार आडत**

**वेळापूर :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत शिखर शिंगणापूर येथील महादेवाची यात्रा व कावडी उत्सव सुरू असल्याने या कार्यक्रमाला भाविकांची महाराष्ट्रातून मोठी गर्दी झाली होती. शनिवारी एकादशी दिवशी सायंकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास शिंगणापूर एसटी स्टँडवरून शिंगणापूर यात्रा स्पेशल एसटी बसमध्ये ५० प्रवासी भरून व देवाची कावडी ठेवून परतीच्या प्रवासासाठी पंढरपूरकडे निघाली होती. ही बस शिंगणापूर घाटातील शेवटच्या वळणावर आली असता वळण घेताना तिचा एअर ब्रेक फेल झाल्याने ती रोडच्या संरक्षणासाठी असणाऱ्या कठड्याला धडकण्याच्या स्थितीत असतानाच तेथे कर्तव्यावर हजर असणारे वेळापूर पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार जनार्दन करे यांच्या लक्षात सदर घटना येताच त्यांनी कोणताही विलंब न करता तत्काळ कठड्याजवळ असलेला मोठा दगड उचलून बसच्या पाठीमागील चाकाच्या पुढे लावला. सदर बस कठड्याला न धडकता जागेवरच थांबल्याने अपघाताचा अनर्थ टळला व एसटीबसमधील ५० भाविकांचे प्राण वाचले.

पोलीस हेड कॉन्स्टेबल जनार्दन करे यांच्या कर्तव्याबद्दल त्यांचे एसटीबसमधील भाविकांनी आभार मानले. सदरची एसटीबस एअर ब्रेक फेल झाल्याने बसगाडी रोडवर आडवी उभी होती. त्यामुळे शिंगणापूर ते नातेपुते मार्गावर एक तास वाहतूक बंद पडली होती. नातेपुते पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपांगे यांच्या मार्गदर्शनाखाली वरील दोन वळणावरील नेमणुकीस असलेले वेळापूर पोलीस स्टेशनचे पोलीस नाईक संदीप पाटील, पोलीस नाईक देशपांडे, पोलीस कॉन्स्टेबल माळी, पोलीस कॉन्स्टेबल बिराजदार यांना बोलावून घेऊन सदरची वाहतूक सुरळीत केली.

शिंगणापूर यात्रा महोत्सवाच्या काळात पोलीस कर्मचारी जनार्दन करे यांनी चांगले काम करून ५० प्रवाशांचे प्राण वाचवल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

**चांगल्या कामाबद्दल करे यांचा सन्मान...**

वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांना वेळापूर पोलीस स्टेशनचे पोलीस हेडकॉन्स्टेबल जनार्दन करे यांच्या चांगल्या कामाची माहिती मिळताच निलेश बागाव यांनी पोलीस कर्मचारी जनार्दन करे यांचा वेळापूर पोलीस स्टेशनच्या वतीने फेटा बांधून शाल घालून श्रीफळ देऊन सन्मान केला. यावेळी त्यांनी जनार्दन करे यांनी केलेल्या कामाच्या कौतुकाची शाबासकी दिली. यावेळी पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# अडीच वर्षांच्या कारभारावरून राज्याला ठाऊक फडतूस कोण

## देवेंद्र फडणवीस यांचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उद्धव ठाकरे यांचा अडीच वर्षांचा कारभार पाहिल्यावर फडतूस कोण, हे अवघ्या महाराष्ट्राला ठावूक आहे, अशी टीका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. उद्धव ठाकरेंच्या विधानाबद्दल माध्यमांनी प्रतिक्रिया विचारली असता पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दोन मंत्री जेलमध्ये गेल्यावर त्यांचा राजीनामा मागण्याची हिंमत जे मुख्यमंत्री दाखवित नाही आणि त्यांचा लाळघोटेपणा जे करीत असतात, त्यांना बोलण्याचा अधिकार तरी काय? जे वाझेच्या मागे लाळ घोटतात, ज्यांच्या काळात पोलिस खंडणी गोळा करतात, त्यांना बोलण्याचा अधिकार काय? अडीच वर्ष घरात घरात बसून राजकारण करणाऱ्यांनी जास्त बोलू नये. आम्ही संयमाने वागतो याचा अर्थ आम्हाला




बोलता येत नाही असे नाही. ज्या दिवशी बोलणे सुरू करु, त्यादिवशी पळता भूई थोडी होईल. नरेंद्र मोदीजींचे फोटो लावून निवडून येता आणि फक्त खुर्चीसाठी विरोधकांची लाळ घोटता, मग खरे फडतूस कोण, याचे उत्तर थयथयाट करणाऱ्यांनी आधी दिले पाहिजे. महाराष्ट्राच्या जनतेला याचे उत्तर माहिती आहे. ते बोलले त्यापेक्षा खालची भाषा मला येते, मी नागपूरचा आहे. पण, मी तसे बोलणार नाही. कारण, ते माझे संस्कार नाही. पण, याचे उत्तर त्यांना जनता देईल.

आपण 5 वर्ष गृहमंत्री राहिलो आहोत, आता पुन्हा आहे. मला याची जाणीव आहे की, मी पुन्हा गृहमंत्री झाल्यापासून अनेक लोक देव पाण्यात ठेऊन बसले आहेत, की मला गृहमंत्रीपद सोडावे लागेल. पण मी तुमच्या मेहनतीने नाही, तर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वातील सरकारमध्ये गृहमंत्री आहे. जो-जो चुकीचे काम करेल, मी त्याला जेलमध्ये टाकल्याशिवाय राहणार नाही. राज्यात कुठेही कोणतीही अनुचित घटना घडली तर त्याची निष्पक्ष चौकशी करण्यात येईल. पण, त्याआड राजकारण करण्याचा प्रयत्न केला तर ते योग्य ठरणार नाही. चाणक्य एकदा असे म्हणाले होते की, राज्यातील चोर, डाकू, लुटेरु किंवा अपप्रवृतीचे लोक राजाविरुद्ध बोलतात, तेव्हा राजा योग्यप्रकारे कारभार करतो आहे. मी राजा नाही. पण, तरीही देखील चाणक्य जे म्हणाले तेच आता खरे होताना दिसते आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.



# साहित्य अभिवाचनाची पंढरी : चाळीसगाव नगरी





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

त्या कामात माझ्यासारख्या काही शिक्षकांनी त्यांना सहकार्य केले. इ.स. २००० मध्ये प्रसाद वनारसे आणि अतुल कुलकर्णी यांनी 'रंगवर्धन नाट्यव्यवस्था' सोलापुरात सुरु केली. त्यावेळी त्यांचं 'गोष्टीच्या गोष्टीची गोष्ट' हे नाटक खूप चर्चेत होतं, या नाटकाचे अनेक प्रयोग झाले होते. त्यानिमित्ताने नाटक, त्याची प्रक्रिया इ. बद्दल जाणून घेण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक नाट्यसंस्था एकत्र येत होत्या. या चळवळीत चाळीसगावचे हे डॉक्टर आणि त्यांच्यासोबत जोडले गेलेले कलाकार सहभागी झाले. त्याचा खूप फायदा सगळ्यांना झाला. एखाद्या नाट्यसंस्थेची निर्मिती कशी करावी, नाटक कसं बसवावं, त्यात येणाऱ्या अडचणी कशा सोडवाव्यात या सगळ्या गोष्टींचा वस्तुपाठच त्यांना या ठिकाणी मिळाला. नाटक बसवणं, दिग्दर्शित करणं या गोष्टींसोबतच आपल्याला नाटक आवडीनं पाहणारा प्रेक्षकही तयार करायला हवा याची जाणीव त्यातून झाली. समोर जाणकार रसिक प्रेक्षक असेल तरच या श्रमांचं चीज होईल हे लक्षात आलं. त्यातूनच मग चाळीसगावची 'रंगगंध कलासक्त न्यास'




ही संस्था आकाराला आली. या संस्थेचं हे रोपटं लावण्यात डॉ करंबेळकर यांच्यासोबतच सहभागी होते चाळीसगावातील एक रसिक आणि ज्येष्ठ नाट्यकर्मी अशोक अडावदकर, डॉ. च्या सौ. डॉ मीनाक्षी करंबेळकर. हळूहळू हे रोपटं रुजलं आणि बहरलं. ते वाढवण्यात अनेक स्थानिक कलाप्रेमींनी सुद्धा हातभार लावला. रंगगंधच्या निर्मितीत प्रतिमा घाटे, डॉ. पुष्कर घाटे, डॉ. समिता घाटे, शैलेन्द्र मराठे, प्रशांत कोतकर, संजय चौधरी, जयराज भालेराव, दिनेश जोशी, प्रदीप पगारे, जितेश पोतदार, यशराज काळे, तुषार मुजुमदार, पद्मजा खराडे. किरण लद्दे, मेघा बक्षी, विकास शुक्ल, अभिषेक कासोदे, दिग्विजय मगर, निनाद पाठक, चेतन चौधरी, सिद्धेश खैरनार, रजनी आर्य, अदिती राजपूत, प्राजक्ताअमृतकार असे कलाकार जोडले गेले तर सक्रिय कार्यकर्ते म्हणून प्रकाश कुलकर्णी, विश्वास देशपांडे,राजेंद्र चिमणपुरे, प्रवीण अमृतकार, शालिग्राम निकम, रमेश पोतदार, सुजीत माळी, अविनाश सोनवणे, रवी शिरूडे असे कार्यकर्ते जोडले गेले. या सगळ्यांचंच योगदान 'रंगगंध' च्या विकासात आहे. २०१६ मध्ये रंगकर्मींची शिखर संस्था असणाऱ्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने सर्वोत्कृष्ट प्रायोगिक नाट्यसंस्था म्हणून 'रंगगंधचा' गौरव केला.



## आनंदी पहाट

# विवाहाला कधीही बंधन समजू नये

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

विवाह हा स्थिर आणि सुप्रजाकारक कसा होईल, ही काळजी वैदिक काळापासून आधुनिक काळापर्यंत प्रत्येकाला सदैव लागलेली असल्याचे आपण सर्वत्र अनुभवतो. अर्थात, ह्याच काळजीतून विवाह संस्थांची उभारणी होत असल्याचे आपण सर्वचजण जाणतो. पती-पत्नी यांचे वैवाहिक संबंधांमुळे निर्माण होणारे सामाजिक स्थान

त्याच दृष्टीने महत्वाचे ठरते. पती-पत्नींचा परस्परांवर अपेक्षित असणारा विश्वास त्यांच्या नातेसंबंधासाठी महत्वाची भूमिका बजावीत असतो. त्याचे तन-मन एकरूप होण्यासाठी त्यांनीच एकमेकांना समजून घ्यावे लागते. समाजात त्यांच्यासंदर्भातील निर्माण झालेले, त्यांच्या परस्परसंबंधातील नात्याचे चित्र अधिक महत्वाचे असते. ते टिकवून ठेवणे त्याच दोघांवर अवलंबून असते, प्रत्यक्षात तसे असावेही लागते. ह्यासाठी स्व पेक्षा सहचार्याच्या जाणिवांची उणीव असून चालणार नाही, हे सर्वप्रथम समजून घेणे सद्यःस्थितीत जरुरीचे आहे. विवाह करण्यामागचे खरे कारण न समजण्याची उणिव असेल तर असे विवाह दीर्घकाळ टिकत नाहीत अथवा टिकले तरीही व्यक्तिगतरीत्या ते असफल झाल्याचेच स्पष्ट होते. विवाहबंधन असा शब्दप्रयोग आपण सर्रास ऐकतो-करतो, तोच खरे तर चुकीचा असल्याची जाणीव करून घेणे आवश्यक असते. सर्व बंधने झुकारून वैवाहिक सुख, समाधान आणि शांती शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, वैवाहिक, शैक्षणिक पातळींवर परस्परांना देण्यासाठी कटिबद्ध असणे जरुरीचे असते. याठिकाणी स्वतः पेक्षा सहचारीणीचा विचार प्रकर्षाने, प्राधान्याने आणि प्रामुख्याने करणे अभिप्रेत असते. ह्या दृष्टीकोनातून स्वार्थ नाही तर परमार्थ महत्वाचा ठरत असतो. स्त्री-पुरुष दोन्हीही जीवशास्त्रीय दृष्ट्या दोन स्वतंत्र व्यक्तीमत्व आहेत. त्या दोघांमध्ये निसर्गतःच विलक्षण आकर्षण असल्याचे वैज्ञानिक प्रयोगातून स्पष्ट झाले आहे.



आधुनिक केसरी

**ज्ञानाच्या कृपेने | धन्य झालो ||**

असत्याचे पोटी | भय जन्म घेते ||
सत्य दुरावते | काही काळ ||१||
भौतिक सुखाची | नको करू आस ||
निशीदिन ध्यास | विठ्ठलाचा ||२||
परमार्थाचे ठायी | सुखाचा सागर ||
नामाचा जागर | निरंतर ||३||
सत्याचा आदर | नित्याने करावे ||
सत्कर्माने व्हावे | चित्त शुद्ध ||४||
सुखावलो आता | आत्मचिंतनाने ||
ज्ञानाच्या कृपेने | धन्य झालो ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

देहि देहि स्मृतिं देहि
मह्यं ते पादयोर्मातः |
त्वत्प्रसादात् जयो मे च
भवेत् सुनिश्चितो मातः || 4 ||
मला तुझ्या चरणांची स्मृती दे, स्मृती दे, स्मृती दे. माते, तुझ्या प्रसादाने माझा जय सुनिश्चित होईल.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

नियम बद्ध व्यतित करुँ, उत्तम समय अमूल ।
नर जीवन का ध्येय सब, ऊपलब्ध अनुकूल ।।२१।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल चतुर्थ अध्याय) ०२/०४/२१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
अमूल्य उत्तम वेळ असा नियमपूर्वक व्यतीत केला पाहिजे की ज्यामुळे मनुष्य जीवनातील सर्व आवश्यक लक्ष्य पूर्ण होतील.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## 'निजसुखगुणविश्रामा'

आधुनिक केसरी

मला सांगायला अतिशय खेद होत आहे की आज स्वातंत्र्याच्या नावाखाली मुली,बायकांनी जो स्वैराचार चालवला आहे त्यांनी तर सीतामातेला आपल्या अंतकरणात कायम ठेवले पाहिजे. सीताराम ही महासंकल्पना आहे. 'जेथे राघव तेथे सीता'
*वाल्याकोळी-रामायणातील ग्रंथकार--कुटुंबातील पालन पोषणासाठी खुन,दरोडे घालणारा पण राम नामाने पवित्र झालेला आपल्या दुष्कर्माला कुणीही वाटेकरी नाही. हे ध्यानात ठेवायला




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

लावणारा वाल्याची गोष्ट आजच्या भोगवादी युगात डोळ्यात झणझणीत अंजन घावणारी आहे. कुणासाठी काही साठवून ठेऊ नका. विध्वंसापेक्षा स्रुजनशीलता महत्वाची आहे. शबरी,जटायु,सुग्रीव,हनुमान परीट शुर्पणखा,दशानन रावणहे सर्व जण आपापल्या परीने समाजातील नितिमुल्ये जपण्यासाठी अभ्यास साचा विषय आहेत. जो जो जो रे श्रीरामा निजसुखगुणविश्रामा बाळा जो जो रे।। चारी मुक्तिचा विचार चरणीं तुझ्या पाहुदे थोर।। दास गातसे पाळणा।। प्रत्येक जीवा स्वस्वरूपाचा व्हावा बोध।।

# मध्यम स्थितीतली माणसे संगतीला चांगली

आधुनिक केसरी



एका गावात चोरांची एक सभा भरली. तीत काही चोर म्हणाले की, लूट करायची ती हानी करून करावी; तर काहींचे असे म्हणणे पडले की, कुणाला उगीच मारायला नको, नुसतीच लूट करावी; पण लूट करावी असे सर्वांचेच ध्येय होते ! तसे आपले होते. एक म्हणतो, व्यवहारदृष्ट्या प्रपंच करावा; दुसरा म्हणतो, तसे नव्हे, योग्य-अयोग्य पाहून प्रपंच करावा; तर तिसरा म्हणतो, स्वतःचा स्वार्थ साधून प्रपंच करावा; परंतु देवाचे अधिष्ठान ठेवून प्रपंच करावा असे कुणीच म्हणत नाही ! सगळ्यांना प्रपंच 'हवा' आणि देव असला तरी चालेल. म्हणजे प्रपंच तेवढा खरा असे ते मानून चालतात, देवाविषयी मात्र त्यांच्या मनात संशय असतो. वृत्ती कितीही अस्थिर असलेली त्यांना चालते. दारू पिऊन बेहोश झालेला माणूस मनाला येईल ते गाणे गातो. असा एक दारुडा गाणे गात असताना दुसरा दारुडा त्याला म्हणू लागला की, 'अरे, हे असले गाणे काय म्हणतोस ? तुला काही कळत नाही.' नंतर काही वेळाने तोच प्रश्न पहिल्या दारुड्याने दुसऱ्या दारुड्याला विचारला ! त्याप्रमाणे, प्रपंचामध्ये ज्यांची वृत्ती स्थिर नाही अशा लोकांनी वाटेल ती मते प्रतिपादन करावीत असे घडते आणि मग ते एकमेकांना नावे ठेवतात. आपला प्रपंचातला व्यवहार हा असा असतो. 'आम्हाला बंधने नकोत' असे म्हणणारे लोक वेडेच समजले पाहिजेत. समाज हा बंधनांशिवाय राहूच शकत नाही. खरोखर, नोकरीमध्ये फार त्रास नसेल तर ती मालकाइतकीच सुखाची असते; उलट कित्येक वेळा मालकीमध्येच फार त्रास असतो. व्यवहारामध्ये आपण दुसऱ्याची लबाडी ओळखून वागावे एवढीच लबाडी आपल्यामध्ये असावी. पण स्वतः लबाडी करू नये; म्हणजेच, आपले डावपेच किंवा लबाडी लोकांना फसविण्यासाठी नसावी. लोकांकडून न फसण्याइतकेच आपण व्यवहारी असावे. व्यवहाराच्या दृष्टीने बघितले तर मला मध्यम स्थितीतली माणसेच जास्त भेटली. ती व्यवहाराला आणि संगतीला फार चांगली असतात, कारण ती सर्व बाजूंनी मध्यम असतात; त्यांचे पाप मध्यम, पुण्य मध्यम आणि परमार्थदेखील मध्यमच असतो. असा मनुष्य वेळप्रसंगी कर्जबाजारी झाला तरी चालतो पण कर्ज किती असावे, तर या महिन्यात देऊन टाकता येईल इतकेच.

**आजचे बोधवचन आहे – ६९. नीतिधर्माचे आचरण ठेवता यावे, मुलाबाळांचे रक्षण करता यावे, अब्रुने जगता यावे, इतका पैसा जवळ असला की तो मनुष्य श्रीमंत समजावा.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

औषध द्यावया चाळविलें बाळा । दावूनियां गुळा दृष्टीपुढें ॥३॥
तरावया आधीं शोधा वेदवाणी । वांजट बोलणीं वारा त्यांचीं ॥४॥
तुका म्हणे जयां पिंडाचें पाळण । न घडे नारायणभेट तयां ॥५॥
मृगजळ दिसे साचपणा ऐसें । खोटियाचें पिसें ऊर फोडी ॥१॥
जाणोन कां करा आपुलाले घात । विचारा रे हित लवलाहीं ॥ध्रु.॥
संचित सांगातीं बोळवणें सवें । आचरलें द्यावें फळ तेणें ॥२॥
तुका म्हणे शेखी श्मशान तोंवरी । संबंध गोवरी अंगीं सवें ॥३॥
गौळीयाची ताकपिरें । कोण पोरें चांगलीं ॥१॥
येवढा त्यांचा छंद देवा । काय सेवा भक्ती ते ॥ध्रु.॥
काय उपास पडिले होते । कण्याभोंवते विदुराच्या ॥२॥
तुका म्हणे कुब्जा दासी । रूपरासी हीनकळा ॥३॥
आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥१॥

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ५ एप्रिल २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# येडेश्वरी यात्रा चैत्र पौर्णिमेला राष्ट्रीय महामार्ग अंधारातच

## बंद पथदिवे सुरू करायला मुहूर्तच मिळेना : शासन कारवाई करणार का!

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यासह मराठवाड्याच मोठं शक्तीपीठ आई येडेश्वरीची कळंब तालुक्यातील येरमाळा येथे दरवर्षी भरत असते. ही आई येडेश्वरीची यात्रा अवघ्या एका दिवसावर आली आहे. या यात्रेसाठी लाखो भाविक येडेश्वरी नगरीत चुना वेचण्यासाठी चैत्र पौर्णिमेच्या दिवशी लाखोच्या संख्येने जमत असतात. नंतर पाच ते सहा दिवस चालणाऱ्या या यात्रेमध्ये आलेल्या भाविकांच्या गर्दीत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून प्रशासन एक महिना अगोदरच कामाला लागलेले आहे. यात्रा आनंदात उत्साही वातावरणात पार पडण्यासाठी येरमाळा येथे गावकऱ्यासोबत ्रशासनाच्या बैठकही पार पडलेल्या आहेत. यात्रेत दरवर्षी करोडो रुपयांची उलाढाल होते. त्यासाठी अनेक भागातून येणाऱ्या व्यापाऱ्यांचे दुकानांचे स्टॉलही यात्रेत लावले जातात. यात्रेच्या आठ दिवस अगोदरच अनेक व्यापाऱ्यांनी आपल्या जाग्या निश्चित करण्यासाठी दुकानांमध्ये सामान लावण्यासाठी येण्यास सुरुवात केली आहे.

मात्र येरमाळ्यात येत असताना, व्यापाऱ्यांना राष्ट्रीय महामार्ग 52वरील पथदिवे बंद असल्या कारणामुळे येरमाळ्यात येताना महामार्गा प्रवास करण्याचा टोल आकारणी भरूनही अंधारातूनच मार्ग येण्याची नामुष्की ओढवली आहे.

आता याच राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाण पुलावरून पायी चालत, दोन चाकी किंवा चार गाडी घेऊन जात असताना उड्डाणपुलालगत बसवलेले पथदिवे बंद असल्याकारणाने चोरट्यांकडून अंधाराचा



फायदा घेऊन भाविकांची लूटमार होऊ शकते. महिला भाविकासह लहान मुले वयोवृद्ध अनेकांना

> यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये त्यासाठी रोड लगत असणारे पथदिवे बंद असल्यास संबंधित कंट्रक्शन दारावर कारवाई करण्यात येईल
> **–अहिल्या गाढाळ, उपविभागीय अधिकारी,कळंब**

याची धास्तीच बसलेली आहे. धाराशिव जिल्ह्यामध्ये आई तुळजाभवानी प्रमाणेच येडेश्वरी हे खूप सुद्धा लोकांच्या भक्तीचे श्रद्धा स्थान आहे. दरवर्षी चैत्र पौर्णिमाला येरमाळा येथे लाखों भाविक दर्शनासाठी येतात. मात्र यावर्षी राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे आज पर्यंत देखील सुरू करण्यात आलेले नाहीत.

यात्रेसाठी आलेल्या भाविकांच्या गर्दीत अंधाराचा गैरफायदा घेत मोठी चोरी व लुटमार होऊ शकते, याकडे प्रशासनाचे लक्ष असणे गरजेचे आहे.

आई येडेश्वरी च्या दर्शनासाठी येरमाळा नगरीत नगरीत विविध कामानिमित्त बाहेर पडलेले भाविक येरमाळ्यात दाखल होत असताना येरमाळा परिसरातील उड्डाण पुलावर बसवलेले पथदिवे रात्रीच्या वेळी चालू स्थितीत असणे खूप महत्त्वाचे आहे.

प्रशासनाकडून महामार्ग कंट्रक्शन विभागाला भाविकांच्या सोयीसाठी पथदिवे चालू ठेवण्याबाबत ठणकावणे अत्यंत गरजेचे आहे.

कारण उद्यापासून सुरू होणाऱ्या येडेश्वरी यात्रेसाठी शहराकडून येरमाळा गावाकडे येणारे अनेक भाविक राष्ट्रीय महामार्ग 52 चा टोल भरूनच येणार आहेत. त्यासाठी *आय आर बी कंपनीने भाविकांची टोलच्या नावाखाली लूट करून अंधाराचा रस्ता दाखवू नये. अशीच भावना समस्त महामार्ग वरून ये जा करणाऱ्या वाहनधारकांमधून बोलली जात आहे.



# शासकीय योजनांबाबत लोकप्रबोधन!

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लोकरंजन लोककला प्रतिष्ठानच्या वतीने सिल्लोड तालुक्यात शेतकऱ्यांसह समाजातील विविध घटकांसाठीच्या कल्याणकारी योजनांचा प्रभावी प्रचार आणि प्रसार करण्यात आला. जिल्हा माहिती कार्यालय व सामाजिक न्याय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मार्च महिन्यातील अखेरच्या आठवड्यात या जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

सात गावांत साथ! शाहीर डॉ. शेषराव पठाडे आणि सहकाऱ्यांनी वरखेडी, बनकिन्होळा, निल्लोड, कायगाव, पिंपळगाव (पेठ), वरूड-पिंपरी, टाकळी जिवरग या सात गावांत गण, गौळण, रंगबाजी आणि लोकगीतांतून योजनांचा जागर केला. सातही गावांत कलारसिकांकडून चांगले सहकार्य मिळाले. लोकरंजनातून लोकप्रबोधन मागेल त्याला शेततळे, एक रुपयात पीकविमा, नमो किसान सन्मान निधी, रमाई आवास, सुशिक्षित बेरोजगारांसाठी कौशल्य विकास, राजर्षी शाहु महाराज शिष्यवृत्ती, अनुसूचित जाती, नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनांसह तृतीयपंथीयांना सन्मानाजनक वागणूक आदींबाबत हलक्या-फुलक्या विनोदांसह अस्सल ग्रामीण ढंगात नाट्य-संवाद, लोकगीतांद्वारे लोकरंजनातून लोकप्रबोधन केले. प्रतिसाद आणि प्रशंसा शाहीर पठाडे यांच्यासह सूत्रधार के. एस. नवतुरे, साथीदार अमोल खंडागळे व गोपाल भालेराव यांनी कार्यक्रमांत रंग भरले. ढोलकीवर ज्येष्ठ कलावंत अभिमान मिसाळ, तर पेटीवर सुप्रसिद्ध गायिका रेखा भारती यांनी दमदार साथसंगत केली. गावागावांत आबालवृद्धांकडून कार्यक्रमांना जोरदार प्रतिसाद मिळाला. गावोगावचे सरपंच, उपसरपंचांसह सर्व सदस्य, पोलीस पाटील, पत्रकार, ग्रामसेवक, ग्रामस्थांनी कलापथकातील कलावंतांचा यथोचित मान-सन्मान करून कार्यक्रमाची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

# खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रयत्नातून नांदेड जिल्ह्यातील 87 गावांत पाणंद रस्ते मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**दत्ता पाटील माळेगावे**

**मुखेड :** ग्रामीण भागातील पांदण रस्त्यांचा प्रश्न मार्गी



लागावा यासाठी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकारातून यशस्वी प्रयत्न करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील जवळजवळ सर्वच विधानसभा मतदारसंघात 87 गावातील पांदण रस्त्यांना मंजुरी देण्यात आली आहे. यासाठी प्रत्येक गावातील एक किलोमीटरच्या रस्त्यासाठी 25 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याचेही खा. चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालयातून कळविण्यात आले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचा अत्यंत जिव्हाळाचा प्रश्न म्हणून पानंद रस्त्यांकडे पाहिले जाते. पांदण रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमण , पांदण रस्त्यांची बदललेली दशा आणि हळूहळू पांदण रस्ते नामशेष होण्याच्या मार्गावर आले असल्याने त्या त्या भागातील शेतकऱ्यांना आपापल्या शेतीकडे जाणे येण्यासाठी आणि शेतीमालाची वाहतूक करण्यासाठी अनंत अडचणी होत्या. ही बाब लक्षात घेता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , रोजगार हमी योजना मंत्री संदीपान भूमरे यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने पांदण रस्त्याच्या विकास कामासाठी भरीव असा निधी मंजूर केला आहे . नांदेड जिल्ह्यातील विविध मतदारसंघातील ग्रामीण भागातील पांदण रस्त्याच्या विकासासाठी खा.चिखलीकर यांनी पाठपुरावा केला होता . या पाठपुराव्याला यश आले असून जिल्ह्यातील 87 गावातील पांदण रस्त्याच्या कमना मंजूरी देण्यात आली आहे . प्रत्येक गावात एक किलोमीटरचा रस्ता होणार असून यासाठी 25 लाख रुपये निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. मंजूर झालेल्या गावांमध्ये लोहा तालुक्यातील किवळा, ढाकणी, वडेपुरी, वडगाव, टेळकी , टाकळगाव, आडगाव, खडकमांजरी, पांगरी, सोनखेड, जानापुरी , दगडगाव , नांदेड तालुक्यातील लिंबागाव, थूगाव, तळणी ,वडवणा, बोरगाव, देगलूर तालुक्यातील वझर, नागराळ , कंधार तालुक्यातील चिखली, लालवाडी, सावळेश्वर ,औराळ ,बारूळ, गणा तांडा, पानशेवडी ,हिरामण तांडा, गोगदरी, नंदनवन , मुदखेड तालुक्यातील बारड, आमदुरा ,वासरी, रोही पिंपळगाव ,मुगट , वाई ,फु, चिकाळा तांडा, तिरकसवाडी, पाथरड, भोकर तालुक्यातील रेणापूर, कांडली, हळदा, जाकापूर, देवठाणा ,हसापूर, रायखोड ,उमरी तालुक्यातील धानोरा, धानोरा वाडी, बोळसा, धानोरा बुद्रुक, बितनाळ, महाटी, करमाळा, सोमठाणा, उप धर्माबाद तालुक्यातील चोंडी , बाळापुर , समराला , रत्नाळी, मुखेड तालुक्यातील बिल्लाळी, अर्धापूर तालुक्यातील देळूब खुर्द, मेंडला, कोंडा , बिलोली तालुक्यातील कासराळी, बेळकोणी बुद्रुक , सावळी, चिंचाळा , गुजरी, हुनगुंदा, नायगाव तालुक्यातील शेळगाव, कुंचोली,



कंडाळा याशिवाय लोहा तालुक्यातील पोमा नाईक तांडा, मुखेड तालुक्यातील खतगाव , मुदखेड तालुक्यातील धनज , कंधार तालुक्यातील बारूळ , मुदखेड तालुक्यातील निवघा, बिलोली तालुक्यातील सावळी, कंधार तालुक्यातील पिंपळाची वाडी, लोहा तालुक्यातील दापशेड , भोकर तालुक्यातील महागाव , बटाळा, मुदखेड तालुक्यातील पिंपळगाव नायगाव तालुक्यातील नरसी, कंधार तालुक्यातील चिखली ,येलूर ,कारेगाव या गावातील पांदण रस्त्याच्या कामाचा समावेश आहे. पांदण रस्त्यांसाठी निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रोजगार हमी योजना मंत्री संदीपान भुमरे यांचे खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आभार व्यक्त केले आहेत.



# चीनला ठणकावले

आधुनिक केसरी

भारत आणि चीन यांच्यातील संबंध सीमाभागातील घडामोडींमुळे कायम तणावपूर्ण राहिले आहेत. पश्चिमेकडे चीनने भारताच्या काही भूभागावर दावा सांगितला असताना दुसरीकडे पूर्वेकडेही अरुणाचल प्रदेशमधील मोठ्या भागावर चीनकडून सातत्याने दावा सांगितला जात आहे. आता तर अरुणाचल प्रदेशमधील तब्बल ११ ठिकाणांचा उल्लेख 'दक्षिण तिबेट' असा करून चीननं या ठिकाणांची चिनी नावेच जाहीर केली आहेत. या पार्श्वभूमवीर भारतातून त्यासंदर्भात तीव्र भावना व्यक्त होत असून भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून यासंदर्भात सविस्तर भूमिका जाहीर करण्यात आली आहे. चीनच्या नागरी कामकाज विभागाने रविवारी अरुणाचल प्रदेशमधील एका मोठ्या भूभागाचा उल्लेख 'दक्षिण तिबेट' असा केला. यानंतर या भागातील ११ ठिकाणांची चिनी नावे चीनकडून जाहीर करण्यात आली. यामध्ये थेट अरुणाचल प्रदेशची राजधानी इटानगरजवळच्या एका ठिकाणाचाही समावेश आहे. गेल्या पाच वर्षांत चीनकडून अशा प्रकारे जाहीर करण्यात आलेली ही तिसरी यादी आहे. याआधी २०१७ मध्ये चीनकडून ६ ठिकाणांची यादी जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर २०२१मध्ये १५ जागांची यादी जाहीर केली होती. चीनने केलेल्या या आगळिकीबाबत माध्यमांमधून माहिती समोर आल्यानंतर भारताने त्यावर परखड शब्दांत चीनला ठणकावले आहे. "आम्ही यासंदर्भातल्या बातम्या वाचल्या. चीनकडून असा प्रयत्न पहिल्यांदाच होत नाहीये. आम्ही ही यादी फेटाळून लावत आहोत. अरुणाचल प्रदेश हा भारताचाच अविभाज्य भाग होता, आहे आणि कायम राहणार आहे", अशा शब्दांत भारतीय परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी चीनला सुनावले आहे. "अशा प्रकारे वेगळी नावे दिल्याने अरुणाचल प्रदेश भारताचा अविभाज्य भाग असल्याच्या वास्तवात कोणताही बदल होणार नाही", असेही अरिंदम बागची यांनी म्हटले आहे.

# आयुष्यात मिठाचा वाटा किती ?



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये मीठ एक फक्त अन्नपदार्थ नाही, एक पूर्ण चळवळ आहे, एक परिपूर्ण तत्त्वज्ञान आहे. त्यामुळेच इतिहासाची पाने उलटताना मिठाच्या काही कथा आपल्या समोर येतात. महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीबरोबरच सत्याग्रहाचा मार्ग अवलंबला. त्यांनी मिठालाच आपले शस्त्र बनवले. मिठाच्या सत्याग्रहानेदेखील स्वातंत्र्याच्या लढाईत महत्त्वाची भूमिका बजावली. म्हणी व वाक्प्रचारांनी आपली भाषा समृद्ध आहे. खाल्ल्या मिठाला जागणे म्हणजे प्रामाणिक राहण्याची नीती आहे. आपल्याकडे ऐकीव गोष्टींनाही महत्त्व आहे. म्हणून कुणाकडे मिठाशी हात पसरणे चांगले नसल्याचे म्हटले जाते.**

या सगळ्या थांब्यांवर थांबत थांबत मीठ ज्यावेळेला आपल्या ताटापर्यंत पोहचतं, त्यावेळेला त्याची कथा आणखी वेगळीच बनते. आरोग्याच्यादृष्टीने मिठाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे, हे आपण जाणतोच. जसा कोणत्याही गोष्टीचा अतिरेक धोकादायक असतो, तसेच मिठाचे आहे.

अधिक मिठाचे सेवन आपल्याला नुकसान पोहचवते, तसे कमी मिठाच्या सेवनानेदेखील होते. त्यामुळे आपल्या आहारात योग्य प्रमाणात मीठ असायला हवे. तरच आपले आयुष्यदेखील संतुलित राहणार आहे.

अलिकडच्या काही वर्षांमध्ये झालेल्या सर्व्हेक्षणानुसार काही गोष्टी समोर आल्या आहेत, त्यानुसार एक म्हणजे 19 वर्षांच्या वर्षांवरील युवकांमध्ये मिठाच्या सेवनाचे प्रमाण वाढत चालले आहे. आणि हे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेने जारी केलेल्या मानकांपेक्षा किती तरी अधिक आहे. मानकानुसार प्रत्येक माणसाला दररोज पाच ग्रॅम मिठाचे सेवन पुरेसे आहे. मात्र सर्व्हेक्षणानुसार आपल्या भारतात रोज दहा ग्रॅमपेक्षा अधिक मिठाचे सेवन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) जगातील तमाम जनतेला 'मीठ जरा जपूनच खा', जेवणातून ते शक्य तितके कमीच करा, असा धोशा लावला आहे. दैनंदिन आहारातील मीठ तीस टक्क्यांनी कमी करण्याचा निर्धार 2013 मध्ये करण्यात आला होता. हे उद्दिष्ट 2025 पर्यंत पूर्ण व्हावे, असे ठरले होते. तथापि, त्या दिशेने जगभरातील हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्याच देशांनी पावले उचलली. यामध्ये ब्राझील, चिली, चेक प्रजासत्ताक, उरुग्वे, सौदी अरेबिया, स्पेन, मेक्सिको अशा निवडक देशांचा समावेश होतो. मात्र, भारतासह बहुतांश देशांनी त्या दृष्टीने भरीव आणि ठोस पावले उचलली नाहीत. मिठाच्या वापराबाबत जनजागृती आणि त्यासाठी अन्नपदार्थ उत्पादकांना मार्गदर्शक सूचना करण्याबाबत या देशांच्या शासनसंस्थांनी तोंड बंद केले आहे. धोरणात्मक ठोस कार्यवाही केलेली नाही, ही खेदाची बाब आहे. 'द जॉर्ज इंस्टीट्यूट फॉर ग्लोबल हेल्थ' या ऑस्ट्रेलियाच्या संस्थेचे एक संशोधक, ज्यांचे नाव आहे क्लेयर जॉन्सन. यांनी अलिकडेच मिठाच्या सेवनाच्याबाबतीत भारतातल्या एका अभ्यासगटाचे नेतृत्व केले होते. या अभ्यासात एक गोष्ट समोर आली आहे, ती म्हणजे आपल्या भारतातले लोक अधिक मीठ खाण्यावर फिदा आहेत. त्यांना जेवनात जास्त मीठ आवडते. जॉन्सन यांच्या अहवालानुसार मिठाच्या सेवनाच्या प्रमाणात घट केल्यास भारतीयांचा फायदाच होणार आहे. आपल्या खाण्यातील मिठाच्या प्रमाणात फक्त एक ग्रॅम कपात केली तरी हृदयाचा झटका किंवा हार्ट स्ट्रोकचा धोका 4.8 टक्के कमी होऊ शकतो. आपल्या देशात अशी एक धारणा झाली आहे की, आपण ज्या वातावरणात राहतो, त्या वातावरणात इच्छा नसतानादेखील अधिक प्रमाणात मिठाचे सेवन करावे लागते. वास्तविक आपल्या देशातले हवामान उष्णकटिबंधीय आहे. त्यामुळे आपल्या शरीरातून मोठ्या प्रमाणात घाम बाहेर पडतो. घामाबरोबरच आपल्या शरीरातून आवश्यक असणारे सोडियमदेखील बाहेर पडते. हे कमी झालेले प्रमाण भरून काढण्यासाठी आपण मिठाचे सेवन अधिक प्रमाणात करतो. काही लोकांची अधिक प्रमाणात मीठ खाण्याची कारणेदेखील वेगवेगळी असू शकतात. काही लोक भोजन अधिक स्वादिष्ट बनवण्यासाठीसुद्धा अधिक मिठाचे सेवन करतात. मांसाहार आणि जंक फूड खाणाऱ्यांची दिनचर्या तर सामान्य मात्रेपेक्षा अधिक मिठाच्या सेवनाची असते. कारण असे पदार्थ ज्यादा मिठाशिवाय स्वादिष्ट लागतच नाहीत. याशिवाय जे लोक दारू-बिअरसारख्या नशिल्या पदार्थांचे सेवन करीत असतात, त्यांच्या दिनचर्येत मिठाचे प्रमाणात अधिक असतेच.

खरे तर भारतीय व्यंजनाचा स्वाद याला अधिक कारणीभूत आहे. यात मीठ आणि अन्य मसाले पदार्थांचे प्रमाण अधिक असते. ज्यादा मिठाच्या सेवनामुळे किडनी आणि हृदयासंबंधीचे आजार होण्याचा धोका अधिक असतो. जर आपल्या शरीरातील दोन्हीही किडन्या व्यवस्थित काम करत असतील तर समजावे की, शरीरात जाणारे अधिक मात्रेचे मीठ बाहेर टाकले जात आहे. अधिक मिठाचे सेवन आणखी एका कारणामुळे होत असल्याचे समोर

आले आहे, ते कारण म्हणजे टेबल सॉल्ट. जेवनाच्या टेबलावर मीठदाणी ठेवण्याच्या प्रथेमुळे मिठाचे सेवन अधिक प्रमाणात होत आहे. आपल्या संस्कृतीवर खरे तर हा घालाच आहे, कारण आपण पाश्चिमात्य लोकांचे अंधानुकरण करत आहोत. त्याचाच हा परिणाम आहे. आपल्या संस्कृतीत मीठदाणी ठेवण्याची प्रथाच नाही. दुसऱ्या देशाचे पाहून आपण त्याचा स्वीकार करत असल्याने साहजिकच आपल्या शरीरात मिठाचे अधिक प्रमाण जाणारच! गप्पा-गोष्टी करत असताना विनाकारण आपण अन्नपदार्थांवर मीठ टाकत असतो. याचा धोका आपण वेळीच ओळखला पाहिजे.

मीठ आपल्याला फळ, भाज्या आणि धान्यधान्यादींमधून नैसर्गिकरित्या उपलब्ध होते. गेल्या काही वर्षांमध्ये असे आढळून आले आहे की, भारतीयांमध्ये डाळ, धान्य, भाज्या आणि फळांचे सेवन कमी झाले आहे तर प्रक्रिया केलेले पदार्थ आणि फास्ट फूड यांचा खप वाढला आहे. साहजिकच मिठाच्या सेवनाच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. आपल्या देशांमध्ये ज्या प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांची किंवा फास्ट फूडची विक्री होत आहे, त्यांवर पोषक घटकांच्या प्रमाणांची माहिती दिली जात नाही. कित्येकदा त्यांची माहिती दिलेली असते, पण आपले त्याकडे लक्ष नसते. आहारातील मीठ कमी करण्यासाठी सरकारने धोरणात्मक पावले उचलली पाहिजेत. जनजागृतीद्वारे मिठाचा वापर कशा प्रकारे कमी करता येईल, यावर भर द्यावा. धकाधकीच्या या काळात प्रक्रिया केलेले पदार्थ टाळणे अशक्य असले तरी त्यातील मिठाचे प्रमाण घटवणे शक्य आहे. त्यासाठी सीलबंद पदार्थ उत्पादकांना त्यांच्या उत्पादनांमधील मिठाचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रवृत्त करावे. वेष्टनावर 'कमी मिठाचा पदार्थ' असा ठळक उल्लेख करायला भाग पाडावे. कोणत्या प्रकारच्या पदार्थात मिठाचे तसेच सोडियम घटक असलेल्या पदार्थांचे कमाल प्रमाण किती असावे, याचीही मानके निश्चित करावीत. त्याच्या जोडीला




आपल्या शरीराला वयाच्या हिशोबानेदेखील मिठाचे प्रमाण वेगवेगळे लागते. काही अभ्यासांमध्ये आपल्या देशातल्या युवकांमध्ये ज्यादा मिठाचे सेवन करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. शरीराला मिठाची मात्रा किती लागते, याबाबत वेळोवेळी शोध लागले आहेत. वर म्हटल्याप्रमाणे आपल्या सेवनातून एक ग्रॅम मीठ कमी केले तर हार्ट अटॅकची शक्यता 4.8 टक्क्यांनी कमी होते. याच सर्व्हेणात आणखी एक गोष्ट समोर आली आहे, प्रत्येक चार व्यक्तींपैकी एक व्यक्ती गावात म्हणजे खेड्यात राहते. आणि जे तीन शहरात राहतात, त्यातल्या प्रत्येकी एकाला हायपरटेन्शनची समस्या आहे. हायपरटेन्शन नियंत्रणात आणण्यासाठी मिठाची मात्रा कमी करण्याची आवश्यकता असते. शरीरात सोडियमचे प्रमाण अधिक असल्यास धमन्या अंकुचन पावतात. त्यामुळे ब्लडप्रेशर वाढते. हायपरटेन्शन कार्डियोवेस्कुलर आजारांचे मुख्य कारण बनते. जर भारतीयांनी आपल्या जेवनातून मिठाचे 30 टक्के प्रमाण कमी केल्यास त्यांना हार्ट अटॅकमुळे होणारा मृत्यूचा धोका हा 15 टक्क्यांनी कमी होणार आहे. खरे तर रोजच्या जीवनात जे आवश्यक असलेले 10 टक्के मिठाच्या अतिरिक्त वापराने जगण्याला बसणारी खीळ किती जीवघेणी आहे, हे पटवून देण्यासाठी जनजागृती करावी. आपण नकळतपणे मिठाचे सेवन अधिक प्रमाणात करत असतो. त्यामुळेही आजारांच्या समस्या वाढतात. जसे आपण जास्त मीठ खाल्ल्याने आपले नुकसान होते, तसे कमी मीठ खाल्ल्यानेही होते. ज्या लोकांना उच्च रक्तदाब असतो, ते भितीने फारच कमी मीठ खातात. किंवा खातच नाहीत. अशामुळे त्यांच्या शरीरातील सोडियमची मात्रा कमी होते. मग ते हायपोनेट्रेमिया आजाराने ग्रासित होतात. खरे तर मिठाचा वापर न केल्याने त्यांच्या रक्तातील सोडियमचा स्तर 120 पेक्षाही खाली जातो. त्यामुळे रुग्ण बेशुद्ध होण्याचा धोका असतो. सामान्य माणसाच्या रक्तातील सोडियमचे प्रमाण 135 ते 150 च्या दरम्यान असायला हवे. त्यामुळे उच्च रक्तदाब असला तरी त्याला मीठ हे खावेच लागणार आहे. पण त्याच्या शरीराच्या गरजेनुसार ते हवे. म्हणजेच आपल्या आयुष्यात मिठाचा जो फंडा आहे, तो तसा लगेच समजून येणारा नाही. कमी आणि जास्तच्या दरम्यानचा मार्ग धरूनच मिठाची मात्रा ठेवल्यास आपलेही आयुष्य संतुलित राहणार आहे.

# तोषखाना घोटाळा अमेरिकेतही झाला !



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**डोनाल्ड ट्रम्प न्यूज अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर त्यांच्या कार्यकाळात भेटवस्तू हडप केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ट्रम्प यांनी सुमारे दोन कोटी रुपयांची माहिती दिली नसल्याचे अहवालात म्हटले आहे. पाकिस्तानप्रमाणे अमेरिकेतही तोशाखाना घोटाळ्याचे प्रकरण समोर आले आहे. माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अध्यक्ष असताना कोट्यवधी रुपयांच्या भेटवस्तूंचा घोटाळा केल्याचा आरोप आहे. एका अहवालात म्हटले आहे की डोनाल्ड ट्रम्प परदेशी नेत्यांनी त्यांच्या कुटुंबाला दिलेल्या $250,000 (दोन कोटी) भेटवस्तू उघड करण्यात अयशस्वी ठरले आहेत.**



लोकशाही समितीच्या अहवालात आरोप केले आहेत. लोकशाही समितीच्या अहवालात हे आरोप करण्यात आले आहेत. "सौदी तलवार, भारतीय दागिने आणि डोनाल्ड ट्रम्पचे लार्जर दॅन लाइफ साल्वाडोरन पोर्ट्रेटः प्रमुख विदेशी भेटवस्तू उघड करण्यात ट्रम्प प्रशासनाचे अपयश" या शीर्षकाच्या अहवालात ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, माजी राष्ट्रपती राम नाथ कोविंद आणि यूपीला मिळालेल्या भेटवस्तूला पैसे दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याकडूनही खुलासा झालेला नाही. या भेटवस्तूंची किंमत सुमारे 47 हजार डॉलर्स आहे.

योगी-मोदींनी भेटवस्तू दिल्या अहवालानुसार, ट्रम्प कुटुंबाला भारताकडून $47,000 पेक्षा जास्त रकमेच्या 17 अज्ञात भेटवस्तू मिळाल्याचे कागदपत्रांवरून समोर आले आहे. भेटवस्तूंमध्ये योगी आदित्यनाथ यांची $8,500 फुलांची फुलदाणी, $4,600 ताजमहालचे मॉडेल, माजी राष्ट्रपती कोविंद यांची $6,600 भारतीय गालिचा, पंतप्रधान मोदींची $1,900 कफलिंक्स होती. डेमोक्रॅट्स समिती या गहाळ मोठ्या भेटवस्तू शोधण्यासाठी वचनबद्ध आहे. भेटवस्तूंमध्ये गोल्फ क्लब, एल साल्वाडोरमधील ट्रम्प यांचा फोटो आणि इतर अज्ञात भेटवस्तूंचा समावेश आहे. राष्ट्रपतींवर प्रभाव टाकण्यासाठी त्यांचा वापर केला गेला का, याचीही समिती चौकशी करत आहे. 100 पेक्षा जास्त भेटवस्तू सापडल्या नाहीत अहवालात पुढे म्हटले आहे की ट्रम्प आणि त्यांचे कुटुंब 100 हून अधिक परदेशी भेटवस्तूंचा हिशेब ठेवण्यात अयशस्वी ठरले. या भेटवस्तूंची किंमत एक दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त होती.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आशिष देशमुखांचे मानसिक संतुलन बिघडले; उपचारांची गरज: अतुल लोंढे

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** आशिष देशमुख हे वारंवार काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, राहुलजी गांधी, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यावर बिनबुडाचे आरोप करत असतात. देशमुखांची वक्तव्ये पाहता त्यांचे मानसिक संतुलन बिघडल्याचे दिसते, त्यांना चांगल्या उपचाराची गरज असून ते त्यांनी लवकरात लवकर करुन घ्यावेत, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे म्हणाले आहेत.

यासंदर्भात बोलताना अतुल लोंढे म्हणाले की, लोकशाही प्रक्रियेत वेगवेगळे विचार असणे स्वाभाविक आहे, काँग्रेस हा लोकशाही माननारा पक्ष आहे. जर कोणाला एखाद्या विषयावर काही वेगळे मत मांडायचे असेल तर त्यांनी ते पक्षाच्या व्यासपीठावर मांडले पाहिजे परंतु आशिष देशमुख हे पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांबद्दल प्रसिद्धी माध्यमांमध्ये जाणीवपूर्वक विधाने करून वातावरण गढूळ करण्याचे काम करत असतात. खोक्याची भाषा राज्यात कोणाला उद्देशून केली जाते हे सर्वांना माहित आहेच तसेच आशिष देशमुख यांचा बोलविता धनी कोण आहे हेही माहित आहे. प्रदेश काँग्रेसने त्यांना ताकीद देऊनही त्यांच्या वागण्यात फरक पडलेला नाही. देशमुख यांना जनतेने नाकारलेले आहे, पक्ष वाढीसाठी ते कोणत्याच कार्यात सहभागी नसतात, त्यामुळे आपले अस्तित्व दाखवण्यासाठी प्रसिद्धी माध्यमासमोर पक्षविरोधी वक्तव्ये करुन लक्ष वेधून घेण्याचा त्यांचा आटापीटा दिसतो. पक्षाचे वरिष्ठ नेते त्यांच्याबद्दल योग्य तो निर्णय घेतील, असेही लोंढे म्हणाले.

# गावच्या पडक्या वाड्यावर सत्ता स्थापनेसाठी १ हजार ६२ अर्ज

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** सध्या धाराशिव जिल्ह्यातील धाराशिव, तुळजापूर, कळंब, भूम, परंडा, वाशी, उमरगा व मुरूम या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीची लगबग सुरू झाली असून. गाव पुढाऱ्यांकडून बाजार समितीचा काही वर्षांपूर्वीच दिवसाढवळ्या बाजार करण्यात आला आहे.. आता उगीचच स्वतःच्या खोट्या प्रतीस्थेसाठी, कार्यकर्त्याला काम लावण्यासाठी तसेच पक्षाचा गमजा गळ्यात घातलेल्या साठी  बाजार समिती निवडणूक ही प्रतिष्ठेची होऊन बसलेली आहे...!




निवडणुकीत अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी सोमवारी (३)गावातील जीर्ण झालेल्या व शेवटच्या घटका मोजत असलेल्या पडक्या वाड्यावर म्हणजेच बाजार समितीवर आपल्याच पक्षाची पाटी लावण्यासाठी गाव पुढारी दंड थोपटून निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. आठ बाजार समिती साठी एकूण 1हजार 62 अर्ज निवडणूक विभागाकडे दाखल झालेले आहेत. यंदा सर्वच पक्ष भाजप, शिंदे यांची सेना, ठाकरे यांची सेना, राष्ट्रवादी,काँग्रेस, तर काही ठिकाणी महाविकास आघाडी तसेच मनसे बाजार समितीची निवडणूक लढवत आहेत.

असच काहीच चित्र सध्यातरी पहावयास मिळत आहे. बाजार समितीवर आपल्याच पक्षाची पक्षाची सत्ता येण्यासाठी कंबर कसून कामाला लागलेल्या कार्यकर्त्यांना त्याच बाजार समितीचा बुरुज बड्या नेत्यांनी मागेच जीर्ण करून मोडकळीस आणून सोडलेला आहे. घराच्या भिंतीला  घुस लागल्या नंतर त्या घराची जी अवस्था होते,*

त्याही पेक्षा बेकार अवस्था धाराशिव जिल्ह्यातील अनेक बाजार समित्यांची झालेली आहे.

पाटलाच्या वाड्याप्रमाणे नावात जरी बाजार समिती संचालक, उपसभापती,सभापती मोठेपणा असेल तरी, आपण ज्या बाजार समितीच्या निवडणुकीच्या रिंगणात उतरलो आहोत,त्या रिंगणालाच किती मोठा कर्जाचा वेढा पडला आहे. ते अगोदर बाजार समितीच्या संचालक पदाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणाऱ्या उमेदवाराकडून पाहणे खूप गरजेचे आहे. त्याचबरोबर आपल्याच पक्षाचा झेंडा आपल्या बाजार समितीवर लागावा व त्यानंतर आपल्या नेत्यापुढे एखाद्या गुत्तेदारीचे काम मागता यावं या उद्देशाने बाजार समिती निवडणूक साठी पुढे होऊन काम करणाऱ्या गाव पुढाऱ्यांनी आपल्या गावची "बाजार समिती"ही जीर्ण झालेल्या पाटलाच्या वाड्याप्रमाणे घुसीने खालून पोखरली तर नाही याची पाहणी करणे गरजेचे आहे.  आज नाही तर गेल्या कित्येक वर्षापूर्वीच या बुरुजाला भ्रष्टाचार नावाची घुस लागलेली आहे. तिचं पोखरण काही बंद नाही. त्यामुळे उद्या भावी संचालक म्हणून मान घेण्यासाठी निवडणूक रिंगणात उतरलेल्या नवख्या संचालक बंधुंनो, आपण ज्या बुरुजावर आपल्या पक्षाची पाटी लावायलची तयारी दर्शवली आहे. त्या बुरुजाचा पाया भ्रष्टाचारी घुसिने पोखरला आहे का? नाही, खात्री करूनच संचालक पदा साठी उमेदवारीची माळ नाहीतर, तोच बुरुज ढासलळा तर विनाकारण तुमचेच हात अडकतील.

त्यातही तुम्हाला संचालक पदाच मोबाईल वरती स्टेटस किंवा गाडीवर रेडिअमच नाव टाकण्यासाठी संचालक व्हायच असेल तर कमीत कमी 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, 17 सप्टेंबर, १मे या दिवशी तरी ध्वजारोहणासाठी बाजार समितीकडे जात जावा, अशीच भावना मोडकळीस आलेल्या बाजार समितीकडे पाहून शेतकऱ्यांमधून होत आहे.



# वडोद बाजारात भगवान महावीर जयंतीनिमित्त मिरवणूक

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** जैन समाजाच्या वतीने महावीर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महावीर जयंतीनिमित्त वडोद बाजार येथील दिगंबर जैन मंदिरावर जैन समाज बांधवाच्या वतीने विद्युत रोषणाई करण्यात आली होती. मंगळवारी सकाळी मंदिरात महावीर भगवानची पूजा, दर्शन करून  जेन मंदिरापासून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती या महावीर भगवानच्या प्रतिमा चारचाकी गाडीवर ठेऊन गावात मिरवणूक काढण्यात आली होती. साउंड सिस्टिमवर भक्ती मय गीत वाजवत मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी महिला सह लहान मुले पुरुष मंडळी या मिरवणुकीत मोठ्या संख्येने उपस्थित होते   या मिरवणुकीत महिलानी व ,पुरुषांनी फुगडी खेळून हा आनंदोत्सव उत्साहात साजरा केला यावेळी मिरवणुकीत  पांडुरंग सदवार्ते, सुभाष वायकोस, विलास वायकोस,भिकन वायकोस,अरुण वायकोस,बाळू खुळे वृषभ खुळे, डॉ. सुहास वायकोस, कमलेश वायकोस, मनोज आंबेकर, रवी वायकोस, निलेश पाटणी, धर्मेंद्र पाटणी, शैलेश पाटणी, गजानन तास्कर, प्रफुल्ल तास्कर, सचिन खुळे, नंदु खुळे, केलास वायकोस, सुशील वायकोस ,राजू खुळे, अजित खुळे, गंगाधर खुळे, जगदीश खुळे, प्रतिभा पाटणी, निर्मळ खुळे, निर्मला वायकोस, शिला खुळे, सपना पाटणी,चंदा पाटणी, रुपाली वायकोस, आदिसह पदाधिकारी सोसायटी चेअरमन कडूबा मस्के उपसरपंच गोपाळ वाघ गोविंद पांडे आदींसह गावातील नागरिकांनी या मिरवणुकीत सहभाग घेतला होता.





महाराष्ट्र Business Katta












# बेरोजगारांची वास्तविकता



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**देशात बेरोजगारीच्या समस्येचे स्वरूप दिवसेंदिवस भयंकर होत चालले आहे.त्यातच महागाई कमी होईना ती अधिकच वाढत चालली आहे.ज्या नोकऱ्या हव्या आहेत त्या तर नोकऱ्या मिळत नाहीत. कमी पगाराची नोकरी पत्करून कसे बसे जगण्याचा प्रयत्न होत आहे. अनेकांवर अनेक महिन्यांनंतर पगार घेण्याची वेळ येत असते. तो ही तुटपुंजा पगार हातात घेऊन समाधान मानावे लागत आहे. आर्थिक सक्षमता नसलेल्याना आर्थिक स्तर उंचविण्यासाठी आजही संघर्ष करावा लागत आहे.आपल्याकडे आर्थिक सक्षमता असली पाहिजे.हे साहजिकच सर्वांनाच वाटत असते. परंतु ही आर्थिक सक्षमता तयार होण्यासाठी आपल्यालाच संघर्ष करावा लागणार आहे.**

इथली अर्थव्यवस्था ही पूर्णपणे भांडवलशाहीच्या हाती गेलेली आहे.हे लक्षात ठेवायला हवे.ज्याच्या कडे जास्त भांडवल तोच हा आपल्या देशावर राज्य करू लागला आहे.हा भांडवलशाहीचा वर्ग इथल्या समाज व्यवस्थेत स्वतःचे पाय रोवून उभा आहे.आपलं जगणं हे पूर्णपणे आपल्या दैनंदिन कमाईवर अवलंबून आहे.आजही आपल्याला आपलं आर्थिक बजेट आपल्या कमाईवर बनविता येत नाही.

आपल्या कमाईतून येत असलेला पैसा आपल्याला पूरक ठरत नाही.खिशात आलेला पैसा हा लगेच आपला खिसा खाली करत असतो. आपण,आपल्या गरजा,आपल्या अडी अडचणी आपल्या कमाईतून सुटतच नाहीत हीच खरी परिस्थिती आहे.इथे लाखो रुपयांचा पगार देणाऱ्या नोकऱ्या सुद्धा गायब झालेल्या आहेत.इथे स्पर्धा आहेच परंतु या स्पर्धेतून सुद्धा लाखोंचे अर्ज आलेले असतात.अनेक जण या स्पर्धेत चांगले गुण मिळवित पात्र सुद्धा होत असतात.परंतु नोकरी मिळण्यासाठी आवश्यक असलेल्या जागा मात्र खूप म्हणजे खूपच



कमी असतात.आजही कमी पगारात जास्त राबवून घेणारी इथे नोकऱ्या देणाऱ्यांची व्यवस्था कार्यरत आहे.हातात दुसरी कोणतीच नोकरी नसते म्हणून कमी पगारात काम करण्याची मानसिकता मनामध्ये करावी लागत आहे.कष्ट करण्याची तर क्षमता ही सर्वांमध्येच असते.परंतू त्या कष्टाचे मोल म्हणून मिळत असलेल्या पगारातून मात्र समाधान मिळते तरी कुठे ? आज नोकऱ्यांची परिस्थिती आणि बेरोजगारी हा विषय खूप महत्वाचा होऊन बसला आहे.तसे पाहिले तर हा विषय पूर्वी पासूनच सोडविण्याच्या दृष्टीने बेरोजगारीवर काम करण्याची गरज होती.आज जी समस्या उभी आहे.यात भूतकाळातील रोजगार निर्मिती बाबतची जी जी ध्येय धोरणे राबली गेली ती अपयशी ठरली का ? आजच्या बेरोजगारीवर कालचा ही तितकाच परिणाम झालेला आहे असे म्हणावे लागेल.देशात राज्यात कोणते ही सरकार असुद्या जे सरकार असते त्या प्रत्येक सरकारची जबाबदारी आहे की,मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झाले पाहिजेत. नोकऱ्याच नसतील तर पैसा येणार तरी कुठून ? हे पैशाचे गणित बेरोजगार लोकं बसविणार तरी कशी ? आज देशात गुन्हेगारी प्रवृत्तीचे प्रमाण वाढत आहे. नैराश्य,व्यसनाधीनता,चुकीच्या प्रवृत्ती यांना जवळ केले जात आहे.हाताला कामधंदा मिळेना,पोटाला रोजी रोटी मिळेना अशी भयानकता आज आपल्या देशात सुद्धा आहे. भारतीय संविधान स्वीकारलेल्या आपल्याच देशात गरिबी आणि दारिद्र्य याचे सुद्धा वास्तव पाहायला मिळत आहे.सर्व प्रश्नांची आणि समस्यांची उत्तरे आपल्या संविधानात आहेत.

परंतू संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी आमची सरकारी यंत्रणा कुचकामी ठरत आहे.

नको त्या विषयांवर वाद घालत बसणारे सरकार आणि राजकीय पक्षांनी तळमळीतून बेरोजगारीचा विषय हाताळल्यास नक्कीच इथल्या बेरोजगारांच्या हाताला सुद्धा काम मिळणार आहे. परंतु भांडवलदारांच्या हाती अर्थव्यवस्थेची पूर्ण सूत्र जात असतील तर ज्यांच्या हाती पैसाच नाही अशांकडे पैसा येणार तरी कुठून ? ही बेरोजगारी थांबविण्यासाठी विशेष प्रयत्न होणे गरजेचे आहे. ज्या युवा पिढी वर देशाचे भवितव्य अवलंबून आहे. असे म्हटले जाते.त्याच पिढीला रोजगार उपलब्ध करून देणे व त्यांच्यामध्ये आर्थिक सक्षमता आणणे सुद्धा आवश्यक आहे.बेरोजगारांची वास्तविकता समजून घेऊन इथल्या सरकारने ज्या हक्कांच्या नोकऱ्या आहेत.त्या तर भरती स्वरूपात पुढे आणून नव नवीन नोकऱ्यांची निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.आपल्या देशात युवा पिढीचा आवाज हा प्रगतीच्या दिशेने कायम खणणीत असाच आला पाहिजे.

# मनोरंजनाची नाही कृतीची गरज



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती 14 एप्रिलला मोठ्या आनंदी उत्साहामध्ये साजरी करण्यात येते. भारताच नव्हे तर भारताबाहेर साजरी होणारी एकमेव जयंती म्हणजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचीच होय. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आंबेडकरवादी समाज सर्वोत्तम महोत्सव म्हणून साजरी करत करत असतो. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य हे देशातील अखिल मानव जातीला माणसात आणून हक्क अधिकार बहाल करून राष्ट्रीय सत्ता व संपत्ती मध्ये सहभागी होण्याची संधी देऊन सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे सर्वोच्च कार्य केले आहे. त्यांच्याच या कार्याची जाणीव ठेवून त्यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी होत असते.**

बाबासाहेबांची जयंती साजरी करताना आनंद असतो म्हणून या ठिकाणी प्रसन्न वातावरण निर्मिती केली जाते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे संपूर्ण गावभर मिरवणूक काढली जाते. मिरवणुकीमध्ये ढोल ताशा डीजे यांच्या तालावरती तरुण-तरुणही नसताना दिसतात. आनंदाचा दिवस म्हणून आनंद व्यक्त करण्याचा तो त्यांचा प्रयत्न असतो. अनेक ठिकाणी रॅली झाल्यानंतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर बोलणारा एखादा पन्नास - आठ हजार चा महागडा वक्ता किंवा एखाद्या एक लाखाच्या घरात सुपारी घेणारा गायकांचा संच बोलवून लोकांचे मनोरंजनही केली जाते. मुळात मनोरंजनांमधून प्रबोधन होत असेल तर काही हरकत नाही. परंतु जयंती दिनानिमित्त हजारो लाखो रुपये घेऊन फक्त मनोरंजन करायचे, टाळ्या मिळवायचे, आणि वर्षभर गायब बसायचे असे अनेक वक्ते अनेक गायक आहेत. एखाद्याने गाणे म्हणणे, चांगले आवाजात गाणे म्हणणे हा चवळीचा भाग नसून, तो वैचारिकतेचा भाग नसून, केवळ एक कला आहे. आणि त्या कलेचा उपयोग फक्त पैसा मिळवण्यासाठी होत असेल, तर ते लोक चळवळ आणि विचार कधीही समोर येऊ देत नाहीत. एखाद्याला चांगले बोलता येत असेल त्यांना सुद्धा हाच नियम लागू होतो. भीम जयंती साजरी करताना जेव्हा एखादा गायक किंवा वक्ता बोलवला जातो तर तो चांगला बोलतो म्हणून बोलवणे कधीही उचित ठरणार नाही. तर जो गायक चांगला गातो, चांगला बोलतो तो समाजामध्ये कसा राहतो ? समाजामध्ये चळवळीचे काम कसे करतो ? हे सुद्धा बघणे आवश्यक आहे. सुपारी भेटली तरच बोलायचे अन्यथा वर्षभर गायब राहण्याचे अशा स्वार्थी लोभी लोकांनी चळवळीची व जयंती ची दुर्दशा करून टाकलेली आहे. एखादा वक्ता किंवा एखादा गायक आपल्या कलेतून बाबासाहेबांचे विचार सांगत असेल तर, अगोदर सांगणाऱ्याचे कृत्य तपासणे आवश्यक आहे. आपण एखाद्या गायकाला एखाद्या वक्त्याला हजारो लाखो रुपये देणे यामध्ये गैर असे काहीच नाही. परंतु समाजांमधून मिळालेले हजारो लाखो रुपये फक्त स्वतःसाठीच जर खर्च होत असतील तर यामध्ये मात्र खूप गैर आहे. समाजातून घेतलेला पैसा हा समाजाच्या हितासाठी खर्च जर होत असेल तर अजून जास्त पैसा देण्यात काही हरकत नाही. परंतु मी जाणार आणि बोलणार त्याची मला एवढी सुपारी हवी अशा सुपारी खाऊ वक्त्यांना आणि गायकांना आता बाजूला करून समाजासाठी वेळ देऊन सामाजिक हेतु साध्य करणाऱ्या लोकांना सहकार्य करणे काळाची गरज आहे. देशामध्ये अनेक गोष्टी बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या विरोधात, संविधान विरोधी होत आहेत. बाबासाहेबांनी मिळून दिलेले हक्क अधिकारांवरती वेगवेगळ्या माध्यमातून अंकुश येत आहे. अनेक सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. एकंदरीत काय तर सर्वसामान्य जनतेचे जीवन हे पूर्वीसारखेच होताना दिसत आहे. असे असताना यातही स्वतःचे पोट भरू लोक समाजातून पैसा घेऊन स्वतःच वापरत असतील तर ही सामाजिक समस्या निर्माण करण्यामध्ये तेवढेच सहभागी आहेत. आज गरज आहे की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना त्यांच्या कार्यांना कृतीत उतरवण्याची. कोणतीही चळवळ यशस्वी होण्यासाठी चळवळीला उद्देश हवा, जनसंपर्क हवे, चळवळीला प्रसारमाध्यम हवे, आणि उद्देश पूर्ण करण्यासाठी त्यांच्याकडे नियोजन हवे.तरच ती चळवळ यशस्वी होऊ शकते. आज चळवळीच्या नावाखाली अनेक राष्ट्रीय नेते निर्माण झालेत, परंतु सामाजिक समस्या काही बंद झाल्या नाहीत. याचाच अर्थ अनेक राष्ट्रीय नेते समाजाच्या नावाखाली राजकारणाच्या माध्यमातून स्वतःचा स्वार्थ बघत आहेत. आणि जनतेला समस्या मध्ये टाकत आहेत. अनेक सामाजिक संघटना आणि राजकीय पक्ष असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेत असून हजारो राजकीय नेते तयार झालेले असताना सुद्धा येथे आंबेडकरवादी चळवळीला एक हक्काचे व सर्व समावेशक साधे वृत्तपत्र ही तयार करू शकले नाहीत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जनता अडाणी असताना सुद्धा वाचक वर्ग नसतानाही खर्चातून पत्रकारिता केली. आणि लोकांना जागृत केले स्वतःचे माध्यम तयार करून समाजाचे प्रश्न त्यामधून मांडण्याचा प्रयत्न केला. आज लोकसंख्येने जास्त आहेत, पैशाने श्रीमंत आहेत, लिहिता वाचता येते. परंतु आंबेडकरवादी चळवळीचे



सर्वसमावेशक व संपूर्ण राज्यामध्ये, एका देशामध्ये चालेल अशे एकही वृत्तपत्र निर्माण करू शकले. नाहीत बर यांनी स्वतः तर वृत्तपत्र निर्माण केले नाहीत. परंतु अनेक छोटे मोठे वृत्तपत्र समाजाची जाणीव ठेवून अनेक लोकांनी सुरू केलेले आहेत. स्वतःला समाजाचे नेते समजणाऱ्या हजारो लोकांनी यातील एकही वृत्तपत्र चालवण्यासाठी समर्थन दिले नाही व सहकार्य केले नाही. त्याच पद्धतीने गायक आणि वक्ते यांनी समाजाकडून लाखो रुपये मिळवलेत. परंतु यांनी सुद्धां वृत्तपत्राला समर्थन व सहकार्य करून राज्य लेवल आणि राष्ट्रीय लेवल ला वृत्तपत्र नेले नाही. समस्या फक्त वृत्तपत्राचीच नाही तर अजून सुद्धा समस्या आहेत जसे शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे. आज सर्वसामान्य लोक शिक्षण घेऊ शकत नाही. येथे कॉनव्हेट पासून उच्च शिक्षणापर्यंत लाखो रुपयांचा खर्च होत आहे. हा खर्च करणे सर्वसामान्य लोकांना परवडणारा नाही. समाजामध्ये हजारो नेते असून सुद्धा बाबासाहेबांचे वारसदार समजत असून बाबासाहेबांची शैक्षणिक संस्था यांना टिकवता आली नाही. आणि एखादी दुसरी शिक्षण संस्था उभी सुद्धा करता आली नाही. याचाच अर्थ आमचे वक्ते, गायक, राजकीय नेते फक्त बोल बच्चन करून समाजाचे व बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचे व विचाराचे भांडवल करून स्वतःचा खिसा भरून घेण्यात मग्न झालेले आहेत. आज एखाद्याला जर दवाखान्यामध्ये भरती व्हायचे असेल तर सर्वात मोठा प्रश्न येतो. कारण दवाखान्यामध्ये लाखो रुपयाचा भरणा करावा लागतो. आणि घरातील एका व्यक्तीचा एकदा जर दवाखाना केला तर त्याला समोरची अनेक वर्ष कर्ज फेडण्यामध्ये जातात. ही दैनिय अवस्था आजही समाजाची आहे. परंतु समाजामधून पैसा घेऊन स्वतःचे घरे भरण्यात धन्यता मानणाऱ्या लोकांनी कधीही समाजाला एकत्र करून समाजाच्या हक्काचे एका जिल्ह्यात एकतरी हॉस्पिटल असायला पाहिजे आणि ते निर्माण करण्यासाठी आपण प्रयत्न करायला पाहिजेत असा विचार देखील कोणी केलेला नाही. आणि जे लोक असा विचार करतात त्यांना प्रस्थापित लोक स्वतःला मोठे लेखक, वक्ते, गायक समजणारे लोक त्यांना समर्थन करत नाहीत किंवा त्यांच्या नावाचा उच्चारही कधी करत नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. आज अनेक लोकांकडे शिक्षण घेण्याची कुवत नाही. हा..! नोकरदार वर्ग आहे तो आपल्या मुलांना शिक्षण देईलही परंतु बाकीच्यांचे काय ? समाजाकडे स्वतःचे हॉस्पिटल नाही. समाजात डॉक्टर अनेक आहेत पण समाजाचे हॉस्पिटल नसेल तर काय फायदा. समाजाकडे वकील खूप आहेत पण समाजाचा वकील नाही. ही खंत आहे आणि जे समाजाचे वकील आहेत त्यांना प्रसिद्धी दिली जात नाही हेही तेवढेच खरे आहे. समाजाकडे आज काही प्रमाणात पैसा आलेला आहे. आर्थिक भरभराट झालेली आहे. परंतु समाजाची आजपर्यंत राज्य लेवल व राष्ट्रीय लेव्हल वर एकही पतसंस्था व बँक निर्माण झालेली नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला बँक दिली परंतु समाजाने स्वतःच्या समाजासाठी बँक निर्माण करू शकले नाही. ही चळवळीची खूप मोठी शोकांतिका आहे. आणि म्हणून बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करताना हजारो लाखो रुपयांची उधळन न करता तोच पैसा प्रत्येक गावातून जर बचत केला, आणि त्याच पैशातून जर शाळा, हॉस्पिटल, पतसंस्था यांची निर्मिती केली आणि हा उपक्रम काही वर्षे जरी सुरू केला तरी समाजाला स्वतःच्या शाळा, स्वतःचे हॉस्पिटल, स्वतःच्या बँका, निर्माण होतील समाजातील तरुणांना रोजगार मिळेल. व समाजाची सामाजिक शैक्षणिक व आर्थिक प्रगती होईलच परंतु आरोग्य सुविधेसाठी इतरांवर, महागड्या उपचारांवर अवलंबून राहण्याची गरज पडणार नाही. समाजाची कल्याण होईल समाजाची ताकद एक दिसेल. आणि याच एकीकरणाच्या माध्यमातून राजकीय सत्ता, हक्क अधिकार सहज आणि सोप्या पद्धतीने मिळतील. परंतु यासाठी गरज आहे पद, प्रतिष्ठा मानसन्मान बाजूला ठेवून गटातटाचे राजकारण करणाऱ्या सामाजिक संघटना राजकीय पक्ष यांना बाजूला सारून समाजातील जागृत लोकांनी एकत्र येऊन समाज हिताचा निर्णय घेऊन वैचारिक पद्धतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व कार्य कृतीत उतरवण्याची. आज परिस्थिती जाणीवपूर्वक बिकट बनवली जात आहे. आणि आम्ही वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून फक्त मनोरंजनावरती भर देत आहोत. आणि याचमुळे चळवळीला ना दिशा मिळाली ना समाजाचे कल्याण झाले. बाबासाहेबांचे जीवनावर बोलणे व पैसा मिळवणे खूप सोपे आहे. परंतु बाबासाहेबांचे विचार कृतीत उतरवणे खूप अवघड आहे. बाबासाहेबांनी स्वतःच्या खिशातून समाजासाठी खर्च केला चार-चार मुलांची परवा केली नाही. आणि आजचे लोक समाजातून पैसा घेऊन स्वतःच्या घरादारासाठी व मुलाबाळासाठी साठवून ठेवत आहेत. याला बाबासाहेबांचे वारसदार कसे म्हणता येईल ? बाबासाहेबांचे राजकीय वारसदार वैचारीक वारसदार, नेते खऱ्या अर्थाने निर्माण झाले असते तर, त्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर व विचारावर विश्वास ठेवून, कोणतीही गटबाजी न करता, कोणतीही तडजोड न करता, समाजावर लक्ष ठेवुन समाजाचे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला असता. परंतु राजकीय नेते मिळेल तिथे तडजोड करत आहेत. आणि वैचारिक माणसे सुपारी घेऊन भाषणे देत आहेत. भाषणे देणारे किंवा गाणे म्हणणारे त्यांनी पैसे घेऊ नये असे मुळीच नाही परंतु त्याला काही मर्यादा असायला हवी. आणि जास्त पैसा घेतला तर तो समाजातील गरीब होत करू मुलांच्या शिक्षणावरती आरोग्यावरती खर्च व्हायला पाहिजेत. परंतु हे होताना दिसत नाही. आणि आज आपण जर या बाबींवरती विचार केला नाही, ह्या बाबी जर दुर्लक्षित केल्या तर, येणाऱ्या काळात आपल्याकडे वेळ राहील ना संघटना राहील. ना संघटना राहील ना आरोग्याच्या सुविधा राहतील. आणि हे मिळवण्यासाठी त्यावेळेस मेहनत घ्यावी लागेल. समोरची मेहनत वाचवण्यासाठी आता जर आपण थोडेसे मनोरंजन बंद करून, प्रबोधनाच्या माध्यमातून व समाजाच्या एकीकरणातून सामाजिक समस्या वरती लक्ष जर दिले तर सर्व प्रश्न यशस्वी सुटण्यास मदत होईल. आणि तेव्हा कुठे खऱ्या अर्थाने मनोरंजनाचा आस्वाद घेता येईल.

# छत्रपती शिवाजी महाराज हिंदू राष्ट्रवादाचे काय होते ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल पंडित नेहरू आपल्या डिस्कवरी ऑफ इंडिया- भारताचा शोध या ग्रंथात म्हणतात, "छत्रपती शिवाजी प्रतिहल्ला करणाऱ्या हिंदू राष्ट्रवादाचे प्रतीक होते. जुन्या इतिहासातून त्यांनी प्रेरणा मिळविली. महाराज अत्यंत धैर्यशील आणि उत्कृष्ट नेतृत्वगुण असणारे नेते होते. त्यांनी स्वराज्यासाठी चिवटपणे लढणारा गट म्हणून मराठी जनांना एकत्र केले. त्यांच्यामागे राष्ट्रीयत्वाची पार्श्वभूमी उभी केली आणि या गटास अशी चेतना दिली, की या गटाशी धडका घेत मुघल साम्राज्य अखेर मोडकळीस आले. छत्रपतींचा मृत्यू १६८०मध्ये झाला तरी त्यांच्यानंतर संपूर्ण भारतावर प्रभुत्व प्रस्थापित होईपर्यंत मराठ्यांचा राज्यविस्तार होतच राहिला**

छत्रपती शिवाजीराजे भोसले हे मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य त्यांनी उभे केले आणि इ.स. १६७४ मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छ.शिवरायांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भौगोलिक ज्ञानाचा उपयोग करून आश्चर्यजनक वेगवान हालचालीने बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खचविले. नेमके हल्ले यांचा वापर करून गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे वापरले. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर छत्रपतींनी उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्य कारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. अख्ख्या महाराष्ट्रात ते शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरा होतो. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांचा संयुक्त उल्लेख शिवशंभू असा होतो. सर्वच इतिहासकार सर्वसाधारणपणे शिवाजी महाराजांचा जन्म वर्ष १६३० ते औरंगजेबाचा मृत्यू वर्ष १७०७ यादरम्यानच्या ७७ वर्षांच्या काळास शिवकाल असे म्हणतात.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर दि.१९ फेब्रुवारी १६३०मध्ये छत्रपती शिवरायांचा जन्म झाला. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला जिजामातेंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. शिवबांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता ही विजापूर, अहमदनगर व गोवळकोंडा या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागली होती. शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली व स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. इ.स.१६४७मध्ये सतरा वर्षांच्या शिवरायांनी आदिलशहाच्या ताब्यातला तोरणगड जिंकला आणि स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. तोरणगड हेच स्वराज्याचे तोरण ठरले. त्याच साली त्यांनी कोंढाणा- सिंहगड आणि पुरंदर हे किल्ले आदिलशहाकडून जिंकून पुणे प्रांतावर पूर्ण नियंत्रण मिळवले. या शिवाय तोरणगडासमोरील मुरुंबदेवाचा डोंगर जिंकून त्याची डागडुजी केली. त्याचे नवे नाव त्यांनी राजगड असे ठेवले. राजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. तिचा मराठी अर्थ- ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो, आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो, तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल. होतही गेले तसेच! एकेक किल्ले जिंकत राहिल्यामुळे इ.स.१६५९ साली आदिलशहाने दरबारात शिवाजी महाराजांना संपविण्याचा विडा ठेवला. हा विडा दरबारी असलेल्या अफझलखान नावाच्या सरदाराने उचलला. मोठ्या सैन्यासह आणि लवाजम्यासह तो मोहिमेवर निघाला. अफझलखान वाईजवळ आला, तेव्हा शिवाजीराजांनी सद्याच्या महाबळेश्वरजवळ असलेल्या प्रतापगडावरून त्यास तोंड देण्याचे ठरवले. तहाची बोलणी सुरू झाली आणि अंतिम बोलणीसाठी शिवाजी महाराजांनी स्वतः यावे, असा खानचा आग्रह होता. पण राजेंचे वकिल- पंताजी गोपीनाथ बोकील यांनी खानाला गळ घालून प्रतापगडावरच भेट घेण्यास बोलावले. भेटीच्या नियमांनुसार दोन्ही पक्षांकडील



मोजकीच माणसे भेटीसाठी येतील, दरम्यान सर्वांनी निःशस्त्र राहण्याचे ठरले. शिवाजीराजांना खानच्या दगाबाजपणाची कल्पना असल्यामुळे त्यांनी सावधगिरी म्हणून चिलखत चढविले. सोबत बिचवा तसेच वाघनखे ठेवली. बिचवा चिलखतामध्ये दडविला होता, तर वाघनखे हाताच्या पंजाच्या आतमध्ये वळविलेली असल्यामुळे दिसत नव्हती. महाराजांसोबत जिवा महाला हा विश्वासू सरदार होता, तर अफझलखानसोबत सय्यद बंडा हा तत्कालीन प्रख्यात असा दांडपट्टेबाज होता. प्रताप गडावरील एका छावणीत भेट ठरली. भेटीच्या वेळी उंचपुऱ्या, बलदंड खानाने छत्रपतींना मिठी मारली. राजांचे प्राण कंठाशी आले, त्याच वेळी खानने कट्यारीचा वार महाराजांवर केला, परंतु चिलखतामुळे राजे बचावले. अफझलखानाचा दगा पाहून शिवाजीराजांनी वाघनखे खानाच्या पोटात खुपसली. त्याचबरोबर खानाची प्राणांतिक आरोळी चहूकडे गुंजली. सय्यद बंडाने तत्क्षणी राजांवर दांडपट्ट्याचा जोरदार वार केला, जो तत्पर जिवा महालाने स्वतःवर झेलून शिवाजीराजांचे प्राण वाचले. यामुळेच "होता जिवा म्हणून वाचला शिवा" ही म्हण प्रचलित झाली. आधीच ठरलेल्या इशाऱ्याप्रमाणे भेटीच्या वेळी तीन तोफांचे बार प्रतापगडावरून काढण्यात आले. खानाच्या छावणी जवळपासच्या झाडाझुडुपांमध्ये दडून बसलेल्या मावळ्यांनी हल्ला करून खानाच्या सैन्याची दाणादाण उडविली. खानाचा मुलगा फाजलखान आणि इतर काही सरदार लपूनछपून वाईच्या मुख्य छावणीपर्यंत आले. इथे खानाचा जनाना होता. ते पाठलागावर असलेल्या नेताजीच्या सैन्यापासून वाचण्यासाठी खजिना, हत्ती व इतर जड सामान टाकून विजापूरला जनान्यासकट पळाले. खानाच्या मृत्यूनंतर त्यांनी त्याच्या शवाचे अंत्यसंस्कार इस्लामी पद्धतीने केले. त्याची एक कबर प्रतापगडाच्या पायथ्याशी बांधली आणि त्या कबरीच्या कायम देखभालीची व्यवस्था केली. अफजलखानाच्या मृत्यूनंतर शिवाजीराजांनी दोरोजी नावाच्या सरदाराला कोकण पट्टीतील आणखी किल्ले आणि प्रदेश जिंकण्यास पाठवले. स्वतः राजे सातारा प्रांतात घुसून कोल्हापुरापर्यंत गेले व त्यांनी पन्हाळा जिंकून घेतला. नेताजीने त्याच्या सैन्यासह जवळपास विजापुरापर्यंत धडक मारली. आधुनिक काळात अफझलखानच्या मृत्यूचा हा दिवस शिवप्रताप दिन म्हणून साजरा केला जातो.

प्रकृती खालावत गेल्याने रायगडावर हनुमान जन्मोत्सवाच्या वेळी वयाच्या अवघ्या ५०व्या वर्षी दि.३ एप्रिल १६८० रोजी छ.शिवाजी महाराज मृत्युमुखी पडले. त्यांच्याबरोबर त्यांच्या चौथ्या पत्नी महाराणी पुतळाबाई सती गेल्या. एक उत्तम प्रशासक, उत्तम रयतेचे वाली, हिंदवी स्वराज्य संस्थापक, मराठा साम्राज्य संस्था विस्तारक, शक्तिशाली, निष्ठावान, शूरवीर, मावळ्यांची प्रेरणाशक्ती, जाज्वल्य पराक्रमाने इतिहास रचणारे राजे दृष्टीआड झाले होते. छ.शिवाजी महाराजांचे नाव प्रत्येक भारतीयांच्या हृदयमंदिरात असे सुवर्णाक्षरांनी कोरले गेले, की ते आजतागायत अधिकच झळाळून चमकू लागले आहे, हे सांगणे न लगेच!

# बालसाहित्यात मोलाची भर घालणारी कथाकाव्ये



एकनाथ आव्हाड
संपर्क क्र.: ९८२१७७७९६८

आधुनिक केसरी

**माया धुप्पड हे बालसाहित्यातील एक महत्त्वाचे नाव. गेल्या पाच दशकांपासून सातत्याने त्या लेखनप्रांतात कार्यरत आहेत. त्यांनी मुलांसाठी विपुल बालसाहित्य लिहिले आहे. वाऱ्याची खोडी, पावसाची राणी, गाऊ अक्षरांची गाणी, सावल्यांचे गाव, आभाळाची छत्री असे कितीतरी बालकवितासंग्रह त्यांचे प्रसिद्ध आहेत. तर गरगर घागर, सर्वांची बाग, अनमोल भेट, नखरेल मोर आणि टमरक टूं हे त्यांचे बालकथाकाव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. मातीची उंदीर गाडी हा त्यांचा बालकथासंग्रहसुद्धा मुलांचा प्रसिद्ध झालेला आहे.**

ही सारीच ग्रंथसंपदा मुलांची लाडकी आहेत. मायाताई बालसाहित्य लेखनासोबतच मुलांसाठी कविता गाणी गोष्टींचे कार्यक्रम सादर करून मुलांची आनंदाची बागही त्या फुलवीत असतात. शिक्षण क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आणि विशेष उल्लेखनीय शैक्षणिक, सामाजिक , सांस्कृतिक आणि साहित्यिक कामगिरीबद्दल त्यांना सन २००८ साली महाराष्ट्र शासनाचा थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका राज्य पुरस्कार लाभलेला आहे. तसेच त्यांच्या 'सावल्यांचं गाव' या बालकवितासंग्रहास महाराष्ट्र शासनाने बालकवी पुरस्कार देऊन गौरविले आहे. मायाताई मुलांसाठी मेंढीने दिली बंडी हा खुसखुशीत, रम्य बालकथाकाव्यसंग्रह घेऊन मुलांच्या भेटीला आल्या आहेत. खरंतर, बालकथाकाव्य हा तसा बालसाहित्यातील दुर्मिळ प्रकार. यात कथांचीही गोडी अनुभवता येते आणि कवितेचाही आस्वाद घेता येतो. कथा कवितेच्या संगमावर अवतरणारे हे कथाकाव्य एक सुंदरशी तालकथाच असते. या संग्रहात एकूण बारा बालकथाकविता आपल्याला वाचायला मिळतात. कवितेतली गोष्ट किंवा गोष्टीतली कविता या वेगवेगळ्या न भेटता एकाच वेळी भेटतात आणि आपला वाचनानंद द्विगुणीत करतात, हीच या कथाकाव्याची खरी खासियत. या कथाकाव्यसंग्रहातून कोंबडी, बोका, बैल, घोडा, कुत्रा, वासरू, चिमणी, कावळा, गरुड असे कितीतरी प्राणी पक्षी आपल्याला भेटायला येतात. आपल्याशी संवाद साधतात. आपण ही कथाकाव्य वाचता वाचता त्यातील गोष्टींशी एकरूप होऊन जातो. रानात, ओढ्याजवळ फेरफटका मारून येतो.

वाईटापासून दूर रहावे हे कथाकाव्य कोंबडी आणि बोकोबा यांच्या संवादातून छान फुलवले आहे. कोंबडी गट्टम करायला आलेल्या बोकोबाच्या मनातली लबाडी एक धीट कोंबडी बरोबर ओळखते. ती त्या बोकोबला खडसावून सांगते, बोकोबा निघून जा, वाईट विचार
तुमचा वाईटापासून दूर रहावे, पक्का विचार
आमचा
या कथाकाव्यातून नकळत चांगला संदेश सहजगत्या मिळतो. ससा आणि त्याचे मित्र हे कथाकाव्यसुद्धा नकळत मुलांमध्ये चांगला विचार रूजवण्यास उपयुक्त ठरतं.
सशाच्या मागं एक शिकारी कुत्रा लागतो. मग ससा आपल्या मित्रांना मदतीला बोलावतो. कोणीच मदत करीत नाही. शेवटी ससा स्वतःच या संकटातून मार्ग काढतो. आणि शिकारी कुत्र्यापासून आपला जीव वाचवतो. आपला हात जगन्नाथ म्हणतात तेच खरं हे या कथाकाव्यातून सहज पटते.

वासरू आणि गांधीलमाशी हे कथाकाव्य एका हट्टी वासराची गोष्ट सांगतं. रानातलं हट्टी वासरू संध्याकाळ झाली तरी घरी परतायला तयार नाही. ते कोणाचंच ऐकत नाही.
शेवटी गांधीलमाशी वासराच्या नाकावर बसते. आणि त्याला रागाने म्हणते घराकडे जातो की चावू तुला.अशावेळी वासरू घाबरून पटकन दुडुदुडु पळत घराकडे निघाले.

दोघांचे भांडण तिसऱ्याचा लाभ हे कथाकाव्य आपापसात भांडण्यापेक्षा समजुतीने वागावं. असा छानसा संदेश मिळतो. लबाड कोल्हा या कथाकाव्यात कोल्ह्याची लबाडी एक हुशार कोंबडा अचूक ओळखतो.
कवयित्री मायाताई धुप्पड या कथाकाव्याच्या शेवटी खूप छान सांगून जातात
होते लबाड माणसांची, अशी फजिती पहा
नको लबाडी, गुण मिळवूया, दहापैकी दहा.

कुत्रा आणि सुसर हे कथाकाव्य कुत्रा आणि सुसर यांच्या खुमासदार संवादावर बेतलेले आहे.
यात कुत्रा सुसरबाईला म्हणतो
सुसरताई वर वर तू, छान किती बोलते
परंतु मनात काय तुझ्या, सगळे मला कळते.
संवादातली ही सहजता आणि नेमकेपणाने मनाला भावतो. गुराखी आणि गरूड पक्षी हे कथाकाव्य परोपकाराची महती सांगणारे आहे. गुराखी गरुडास मदत करतो. मग गरूडही गुराख्याच्या मदतीला धावून जातो.
चतुर चिमणी आणि आळशी कावळा हे कथाकाव्य कष्टाळू चिमणी कामचुकार कावळ्याला कशीअद्दल घडवते हे वाचताना मजा येते.
मेंढी ने दिली बंडी हे कथाकाव्य फारच सुंदर हृद्य आहे. थंडीत कुडकुडणाऱ्या आजीला मेंढी आपल्या अंगावरची लोकर काढून बंडी शिवून देते आणि आजीची थंडी पळवून लावते. हे सर्व वाचताना संवेदनशीलतेचा निर्झरच खळाळत आहे अशी जाणीव होते. मायाताई धुप्पड या खऱ्याअर्थाने मुलांमध्ये रमणाऱ्या शिक्षिका. बालमानसशास्त्र उत्तम अवगत असणाऱ्या बालसाहित्यिका. यामुळेच मुलांना काय हवं काय नको हे त्यांना पुरेपूर ठाऊक आहे. बालमनाचा कल त्या अचूक ओळखतात.
ही कथाकाव्य मुलांचे मनोरंजन करता करता नकळत एखादा चांगला विचार सहजपणे देऊन जातात, हेच या कथाकाव्यांचं महत्त्वाचं वैशिष्ट्य होय.

या पुस्तकाला ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण दवणे सरांची आस्वादक प्रस्तावना लाभली आहे. मेंढीने दिली बंडी या पुस्तकातील सर्वच कथाकाव्य मुलांना भावतील. प्रसंगी त्यांना विचार करायला लावतील. आणि त्यांच्या आनंदाचे इंद्रधनुष्य सहजगत्या फुलवतील हेच या पुस्तकाचे खरे यश.
यासाठी मायाताईंचे आपण अभिनंदन करायला हवे.

**पुस्तकाचे नाव : मेंढीने दिली बंडी**
**(बालकथाकाव्यसंग्रह )**
**कवयित्री : माया धुप्पड**
**मुखपृष्ठ व चित्रे : पुंडलिक वझे**
**प्रकाशक: इंक अॅण्ड पेपर पब्लिशिंग हाऊस प्रा.लि.**
**पृष्ठे: ३२ ,किंमत : ७५/- रु.**



# मितवा



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**ह्या रविवारी पहिल्या बॉलमध्येच सिक्स मारणार, असे कित्येक शनिवारी म्हणणारा संजू कित्येक रविवारी पहिल्या बॉलमध्येच आउट होत असे.पण आता बघाच पुढच्या रविवारी असे गेलेले कित्येक रविवार आजही स्मरतात. नि....मग हसून हसून लाल होणारे गाल किती कुठे कसे या साऱ्या तला तो निखळ आनंद आजही एका क्षणाला किती सुख देवून जातो हे शब्दात सांगणे कठीण च!**
**शनिवार रविवार आला म्हटलं कि यांच ठरलेल असायचं, जोतीबाच्या माळालाच ना र!आंब्याच्या झाडाखाली... मग जया, मिलू (मिलिंद,) राघू (राघव) सया (सयाजी) "हो..हो.." तिथचं, " लवकर या रं, सगळ्यांनी."**

विटू दांडू ,बॅट बॉल, खराब झालेल्या सायकलीची चाके, आणि सोबत चार चार गुरं ढोर गुर ढोर बघत बघत दिवसभर नुसता धुडूगुस.
सुरपारंब्या खेळता खेळता , फुटलेला हाताचा कोपर, रक्ताळलेल्या गुडघ्यावर लावलेली माती नि मग हाल्या हं...करत करत फिरणारी सायकलीची चाके फिरत फिरत....काळाच्या चक्रात अशी काही अडकून गेली की... त्या एका रविवारी मारलेला तो बॉल टप्पी टप्पी खात खात खूप खूप दूरवर गेला .. सायकल ची ती चाके ही काळाच्या गतीने पुढे गेली. वाटा वळणा वळणाने वळल्या त्या शेवटी वळणासाठीच होत्या. वळण वाटेवर कधीतरी चढ लागून जेवढ्या गतीने पुढे गेलेले चाक तेवढ्याच गतीने रिव्हस नी मागे येते.अन् एका नव्या विकासाच्या वाटेवरून चालत पुन्हा पुढे जाते. असेच काहीसे....
झाडाच्या पानांची पान गळ होऊन नविन पालवी फुटते.नवी फुले फळे येऊन नव्याने पुन्हा नविन बीज निर्मिती होते. सूर्य उगवून पुन्हा अस्ताला जातो. असे कित्येक सूर्य उगवले नी अस्ताला ही गेले.
कधी झाडाच्या सावलीत एकत्र तर
कधी सिमेंटच्या जंगलात
हरवून गेले.
डिजिटलाच्या
जगात ही कसा
का असेना
एकमेकांचा
हात मात्र हातात
होता.आणि आज
अजूनही आहे.
आज
अजूनही त्या
दहा बारा जणांची
ठरलेली तिच जागा
एकामेकांच्या हातावर
ठेवलेले दहा हात आणि एकच
हिय्या.... आणि त्यांच्या त्या चार ओळी म्हणजे



त्यांचा कोड....कितीही दूर....! त्यांच्या दंगामस्तीची साक्ष देणारे साठी पार केलेलं ते आंब्याच झाड
आजही नव्या उमेदीने..असो! परिवर्तन
हा काळाचा नियम आहे.
वाटा वाटा ना ही काळाचे वेध
लागतात.
दहा दिशांना
वळलेली ती
पाऊले दरवर्षीच्या
उन्ह्याळ्यात आणि
दिपावलीच्या
सुट्टित अजूनही
त्या आंब्याच्या
सावलीत एकत्र येतात,
सुख दुःखाच्या चार गोष्टी
करतात.मागे राहिलेल्या
हाताना हातात घेऊन
पुढे सरतात.

आंब्याचे झाड ही त्यांच्या मैत्रीत पानाची सळसळ करून सामील होत. निरोपाचा क्षण येतो अन् पाऊला खालची धूळ वाटा वाटा नी पांगते. प्रवाहाचा तो ओघ ..कधी काळी त्यातल्या कुठल्याही पायाला रुतलेल्या काट्याची कळ त्या प्रत्येक पायांना येते. कळवललेल्या मनाची फुंकर अन् मदतीचा हात मागे पडलेल्या त्या हाताला खेचून आणतो. कितीदा कठीण काळ आला. पण प्रत्येक कठीण काळ एकमेकांत गुंतलेल्या त्या हाताना वेगळा नाही करू शकला. उलट त्यांना अजून मजबूत करत गेला. गावाच्या विकासासाठी उचललेलं पहिलं पाऊल त्याच झाडाच्या सावलीत उचललं. कितीही मोठं संकट येऊ दे पण मागे नाही हटणार. गावाला यातून आपण बाहेर काढणारच. हा केवळ पोकळ आत्मविश्वास नाही. मनाच्या त्या अतूट धाग्याने बांधलेल्या एकीच्या त्या बळाला यशाची गोड फळे येणारच. क्षण पळे स्थिरावतात.मनाच्या गाभाऱ्यात लावलेल्या झाडांना काही वर्षांनी गोड फळे येणारच.आणि त्याचा एक विशाल वटवृक्ष होणार हे निश्चित च...उगाच नाही म्हणत तरुणाई हा गावाचा देशाचा कणा आहे.
यांच्यातला तो एक मुख्य दुवा म्हणजे
दूरवरून कानी घुमणारा तो आवाज जिथं या साऱ्याची मूळं रुजली. ती.... अभिमानानं गावाच्या मध्यावर साऱ्याकडे लक्ष ठेवून उन्हा पावसात आजही उभी आहे. तो चंद्रसवैरा .. तिच्याच व्हरांड्यात टणटणत टाळ्या वाजवणारी ती .....अगदि स्वत:च्या लेकराचं एखाद्या आईनं ओरडून ओरडून कौतुक कराव. अशी ती...
कितीही दूर असो कधीही केव्हा केव्हा,
कसोटिच्या त्या क्षणात हे हात एकत्र येतील तेव्हा तेव्हा कितीदा ही अन् केव्हा केव्हा
भेटू या वळणावर तेव्हा तेव्हा
सायकलच ते चाक आज... ?तो बॉल ही नाही पण तरीही.. तोच रस्ता..तेच झाड.. आजही त्या सुंदर नात्याच्या प्रतीक्षेत उभ आहे.अजून एका नव्या प्रगतीच्या प्रतीक्षेत....

# कोरा कागद...

आधुनिक केसरी

**विविध अर्थाचे शब्द कधी कधी माणसाला बुचकाळ्यात पाडतात. मग माणूस त्या शब्दांवर धार लावून अन्वयार्थ लावून की, ज्यामुळे एखाद्या व्यक्तीशी त्याचा वादविवाद होण्याइतपत परिस्थिती निर्माण झालेली असते. एका शब्दाचे अनेक अर्थ असून; परंतु परिस्थितीनिरुप एखाद्या लघु किंवा दीर्घ घटनेची त्याचा तकलादूपणाचा अर्थ समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे ठरेल. कोरा कागद म्हटलं की सर्वसामान्य व्यक्तींपासून ते थोर विचारवंतांपर्यंत वेगवेगळ्या विचारांची रत्नमाला मनाच्या आरशात चकाकत असते.**

माणसाच्या मनाला किती तरी विचारांची दरवाजे असतात, कधी वाईट तर कधी चांगले विचार तर कधी ब्लँक.. मग हाच विचार जेव्हा माणसाच्या मनातून एकाकी म्हणा किंवा वेळ आल्यानंतर एखाद्याचे सांत्वन करण्यासाठी किंवा मनामध्ये काहीही न ठेवता आपल्या प्रिय व्यक्तीसमोर अथवा गप्पा मारता-मारता मित्र- मैत्रिणींच्यात सहज प्रकट होतात तेव्हा मनावरील असलेले कितीतरी अंधाराचे सावट दूर होऊन किंवा साखर दंडाने बांधून ठेवलेल्या एखाद्या प्राण्याची सुटका केल्यानंतर होणारी अवस्था अशी परिस्थिती निर्माण होते, तेव्हाच प्रत्येक जण आनंदी जीवन जगू शकतो.

माणसाच्या जन्मताःच त्याच्या सर्व कुंडलीची यादी कर्म पटलाच्या सेवापटावर नोंद झालेली असते. लहान वयात असताना निस्वार्थी मनानं, निरागस स्वभावानं प्रत्येकाचे मन जिंकून घेण्याचा आणि आपण करीत असलेले एखादे कृत्य हे बरोबर आहे की चुकीचे याची तसू बरही कल्पना नसताना आनंदाने बागडताना एखाद्या लहान मूल दिसून येते. योग्य वयात आल्यानंतर समाजातील विविध घटनाक्रमाचे निरीक्षण करून किंवा प्रसार माध्यमातून आपल्या नजरेत त्यातील कृतींची नक्कल करून ती आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत असतात. मग "कोरा कागज था ये मन मेरा" या गीताची नकळत आठवण येऊन भरकटलेल्या दुनियेत आपल्या वर्तनाची उदात्त चित्रीकरण स्पष्ट करीत असतात.

माणसाच्या प्रत्येक कामाची नोंद ही योग्य वेळी होत असते. मग जन्म झाल्यापासून ते मृत्यूपर्यंत असंख्य कितीतरी चांगल्या वाईट कर्माशी तोंड देत जीवन जगावे लागते. एखाद्या शासकीय नोकराच्या सेवा पटाच्या परिस्थितीनिरुप असा हा आपला कोरा कागद जेव्हा जीवन जगताना ॲक्टिव्ह होतो तेव्हा तो कागद कदाचित अदृश्य अवस्थेत असेल, मात्र त्या कागदावरील असलेल्या ऑनलाईन जीवन मूल्यांकन हे घड्याळाच्या प्रत्येक सेकंदावर उमटत असते. जसे की संत तुकाराम महाराजांनी सांगितले आहे की, " शुद्ध बिजा पोटी फळ रसाळ गोमटी". चांगले कर्म करीत राहिले तर त्या कर्माचे फळही निश्चित चांगलेच मिळणार. माणसानं जीवन असं फुलवावं की, त्या फुललेल्या सुंदर मनमोहक बागेत येणारा प्रत्येक माणूस हा त्या बागेतील फुलांच्या सुगंधाने तल्लीन व्हावा आणि त्या फुलातील मकरंद हा भुंग्यांप्रमाणे आपणालाही मिळावा असं जीवन असावं. सहज एखाद्या चांगल्या गोष्टींकडे आकर्षित व्हावं. प्रत्येकजण आपापल्या विचार शैलीचा वापर करून शब्दांद्वारे, मनातील उत्कट भावना प्रकट करतात. बरे, ते त्यांच्या अनादिकालापासून अनुभवाच्या चौकटीतून व्यक्त होतात. मार्ग हा त्यांचा एकदम स्वच्छ आणि निःस्वार्थी, सरळ मार्गाने असतो; परंतु एखाद्याच्या त्या विचारांचा, त्या शब्दांचा आपापल्या पद्धतीने अर्थ जुळविला किंवा तसे मानून शंकेचा विस्फोट जर झाला तर समोरच्या व्यक्तीच्या भावनांशी खेळल्यासारखे होईल आणि मग एखाद्या पतंगासारखी माणसाची अवस्था निर्माण होईल.

माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे. मिळेल तेथपर्यंत जगत राहायचं. काळ, वेळ यांच्या संगतीने कधी जगण्याची अनमोल संधी मिळाली तर त्याच्याशी नेहमी प्रामाणिक राहायचं. हाच आपल्या जीवनाचा कोरा कागद. उद्या कोणाला तरी नक्की मिळणार. मात्र त्यावरील मजकूर कदाचित अस्पष्ट असेल. नवी अशा, नवी दिशा यांचा योग्य मेळ घालताना प्रामाणिकपणा व जीवनमूल्यांचा त्यामध्ये समावेश असावा तरच जीवन समृद्धमय होऊन जीवन जगण्याची कला अवगत होईल. जीवन जगता जगता मरण हे प्रत्येकाला येत असते ; पण ते मरण वेगवेगळ्या दिशेने वेगवेगळ्या कारणांनी येते. फक्त त्याला कारण हवे असते. चांगल्या किंवा वाईट गुणांची नोंद झाल्यानंतर आयुष्याची सीमा ओलांडताना काळ व वेळ एकत्रित आल्यानंतर जीवन अस्ताला सामोरे जावे लागते. प्रत्येकाने इतरांविषयी जर सदाचारी भावनेने विचार करून एकमेकांबद्दल आदर, सौजन्य व एकोपाने राहून येणाऱ्या प्रत्येक संकटाशी तोंड देऊन जीवन जगण्याचा जर प्रयत्न केला तर अघटीत नोंदीची रेषा किंवा ठिपकाही नजरेस पडणार नाही आणि प्रत्येकाने आपल्या मनावर बिंबवलेले संस्कार जर अवलंबिले तर आपल्या जीवनाचा कोरा कागद आहे तसा पारदर्शक राहून प्रत्येक जण जणू बहिर्वक्र अंतर्वक्र आरशातील भिंगासारखं सरळ मार्गाने आपलं आयुष्य आनंदाने स्वतः आणि इतरांनाही जगवण्याचा मानस ठेवून सर्व मानवजातीपुढे एक आदर्श व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवेल. चला तर.. मग आपणही जगण्यातील मजा घेऊन आनंदी व सुंदर जीवन जगण्याचा प्रयत्न करु.

**- दिलीप नामदेव धायगुडे**
**मो.बा.७७३८०३९१९५**

# राहुल गांधीवरील कारवाई दु:खद



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**देशात काही दिवसांपासून अनेक वेगवेगळ्या घडामोडी सुरू आहेत.यात दुमत नाही.त्याचप्रमाने राहुल गांधींवरील कारवाई व खासदारकी रद्द होने हा सुद्धा गंभीर विषय आहे.याबद्दल संपूर्ण कॉंग्रेस पक्षाने आक्रमक भूमिका घेतली आहे ही बाब पक्षाच्या दृष्टीने आवश्यक आहे व सहाजिकच आहे याचे मी समर्थन करतो. परंतु राहुल गांधींचे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या बद्दल अपशब्द बोलने योग्य नाही असे मला वाटते. राहुल गांधी हे कॉंग्रेसचे राष्ट्रीय नेता आहे आणि कॉंग्रेस पक्ष राष्ट्रीय पक्ष आहे.**

स्वातंत्र्याच्या अगोदर स्वतंत्रविरांनी, थोर पुरुषांनी, क्रांतिकारकांनी, स्वतंत्र संग्राम सेनानींना काय काय वेदना सहन कराव्या लागल्या हे फक्त त्यांनाच माहीत आहे किंवा त्यावेळच्या लोकांना माहित आहे त्यामुळे त्यांच्या बद्दल आपण अपशब्द का बोलावे ?कारण त्याकाळात स्वातंत्र्यासाठी लोक घराघरातुन बाहेर निघायचे त्यामुळे त्याकाळचे सर्वांनाच स्वतंत्र योध्दा म्हणायला हरकत नाही.त्यामुळे राहुल गांधींनी सावरकरांना माफीवीर म्हणने योग्य नाही.कारण स्वतंत्र्यासाठी त्यांनी अनेक वेदना झेलल्याचे इतिहासात नमूद आहे.त्यामुळे महाराष्ट्रातील प्रत्येक जनतेच्या हृदयात सावरकर हे स्वातंत्रवीरच आहे मग तो कोणत्याही राजकीय पक्षाचा व्यक्ती असो.त्यामुळे स्वातंत्र्यापूर्वीचे जेही कोणी स्वातंत्र्य योध्दा असेल ते संपूर्ण आपल्यासाठी व देशवासीयांसाठी दैवतच आहे कारण आज क्रांतिकारकांच्या, स्वातंत्र्य विरांच्या पुण्यायीनेच आपण मोकळा स्वास घेत आहोत हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे कोणत्याही पक्षाचे राजकीय पुढारी असो त्यांनी थोरपुरूषांबद्दल बोलतांना आपली जीभ आवरली पाहिजे. राहुल गांधी सावरकरांबद्दल बोलतात, भाजपचे नेता इंदिरा गांधी,जवाहरलाल नेहरू बद्दल बोलतात अशा प्रकारचे नवीन वाद निर्माण करून देशातील जनतेला असमंजस्यतेमध्ये टाकण्याचा प्रयत्न राजकीय पुढारी नेहमीच करीत असतात.यामुळे देशातील मुळ मुद्यापासुन जनतेला विचलित केले जाते.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांनी राजकारण राजकारणाच्या ठिकाणी ठेवावे.परंतु थोर पुरुषांबद्दल किंवा आपल्या पुर्वजांबद्दल घृणास्पद वक्तव्य किंवा सर्वसामान्यांच्या भावना दुखावतील असे कोणतेही वक्तव्य बोलले जाणार नाही याची दक्षता संपुर्ण राजकीय पुढाऱ्यांनी व पक्षानी घेतली पाहिजे.आज देशात अनेक जटील व गंभीर समस्या आहेत महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, शेतकऱ्यांच्या समस्या, कुपोषण, शैक्षणिक समस्या इत्यादी अनेक समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. यावर मंथन न करता संपूर्ण राजकीय पुढारी व पक्ष स्वतःच्या स्वार्थासाठी राजकारण करीत असल्याचे दिसून येते.त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांना



राजकारणासाठी काय करायचे आहे ते अवश्य करावे परंतु थोर पुरुषांच्या बाबतीत सर्वसामान्यांच्या भावना दुखावल्या जाणार नाही याची जातीने काळजी घेतली पाहिजे. देशात स्वातंत्र्यानंतर अशा अनेक घडामोडी झाल्यात परंतु थोर पुरुषांबद्दल अपशब्द कोणीही बोलत नव्हते.परंतु देशात गेल्या काही वर्षांपासून पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी मुळ मुद्दांना बाजूला सारून परिवार वादाच्या नावाखाली आपल्या पुर्वजांना किंवा थोर पुरुषांना बदनाम करण्याचे काम किंवा अपशब्द बोलण्याचे काम करीत असल्याचे दिसून येते.यात राहुल गांधींच दोषी नसुन अनेक पक्षांचे नेते सुध्दा दोषी आहेत. ह्या संपूर्ण प्रक्रिया फक्त सत्तेसाठी असल्याचे दिसून येते. बँक घोटाळे करून देशातील अनेक दिग्गज करोडो रूपया विदेशात घेऊन गेले त्यांचे आपण काहीच करू शकलो नाही आणि काही होणार सुध्दा नाही.कारण घोटाळेबाजांना विदेशात पळून जाण्याचा मार्ग आपल्याच राजकीय पुढाऱ्यांनी सुलभ सोईस्कर करून दिला हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे पक्ष-विपक्षांच्या राजकीय पुढाऱ्यांनो देशातील सर्वसामान्य लोकांच्या भावनांना कुठेही ठेच पोहचणार नाही याची काळजी घ्यावी व थोर महात्मे, स्वतंत्रविर, क्रांतिकारक, थोर पुरुष यांचा सन्मान करावा यात खरे देशहीत आहे.जय हिंद!

# नवीन शैक्षणिक धोरणातून नवीन चातुर्वर्ण्यव्यवस्था



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**शिक्षण हा राष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे. शिक्षण हेच सामाजिक क्रांतीचे साधन आहे. शिक्षण हे मानवी जीवनाच्या विकासाचा पाया आहे. शिक्षणामुळे माणूस सुसंस्कृत होतो. शिक्षणामुळे त्याला चांगले काय अन् वाईट काय हे कळते. शिक्षणातुन नितीमुल्ये दिली जातात. शिक्षणातून सामाजिक व नैतिक मूल्यांचा विकास केला जातो. शिक्षण हे मानवी जीवन सुधारण्याचे प्रवेशद्वार आहे. म्हणूनच महात्मा जोतिबा फुले यांनी पहिल्यांदा अस्पृश्यांच्या मुलीसाठी शाळा काढली. राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे केले व त्यांच्यासाठी आरक्षण धोरण लागू केले. संत गाडगे बाबा म्हणतात की,"शिक्षणाशिवाय माणूस निव्वळ धोंडा आहे."**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका! संघटित व्हा! संघर्ष करा! हे सांगितले. ह्या सर्व महापुरुषांनी शिक्षणाला अग्रक्रम देऊन सर्व अस्पृश्यांनी शिक्षण घ्यावे त्यासाठी प्रयत्न केले. खूप परिश्रम घेतले. त्यांच्या प्रयत्नामुळेच आज देशातली परिस्थिती प्रचंड मोठ्या प्रमाणावर बदललेली आहे. बदलत आहे. कारण त्यांच्या या धोरणामुळेच व त्यांच्या विचारामुळेच आज तळागाळातील दलित, आदिवासी, भटका विमुक्त, इतर मागासवर्गीय व इतर सर्व शिक्षण घेऊन लोकशाहीमुळे आज मोठमोठ्या पदावर विराजमान झालेले दिसतात. कारण या अगोदर या देशात चातुर्वर्ण्यव्यवस्था कार्यरत होती. या व्यवस्थेत दलित, आदिवासी, भटका विमुक्त, इतर मागासवर्गीय व इतरांनाही शिक्षणाची संधी नव्हती. त्यांना जे जे व्यवसाय दिले आहेत ते ते व्यवसाय त्यांनी करावे आणि आपले पोट भरावे असे सांगितले होते.व्यावसायही त्यांनी ठरवून दिलेले होते. त्याप्रमाणे ते करत होते. या देशात इंग्रजांनी त्यांचा व्यापार,व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालावा तोही सुरळीतपणे पार पडावा म्हणून त्यांनी इथल्या सामान्यातल्या सामान्य माणसाला शिक्षण देण्यास सुरुवात केली. अस्पृश्य समाजालाही त्यांनी शिक्षणाचे दारे खुली केली. इंग्रजांकडे कुठल्याही प्रकारची विषमता नव्हती. त्यामुळे इथल्या उच्चवर्णीयांना इंग्रजांचा प्रचंड संताप येऊ लागला म्हणून ते त्यांच्याविरुद्ध आवाज उठवू लागले. यामध्येच जे जे शिकले ते ते या व्यवस्थेला प्रश्न विचारू लागले. कारण शिक्षणामुळे विवेक येतो. विवेकी, विचारी माणूस देशाच्या विकास प्रक्रियेत योगदान देत असतो. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शाळेत शिकलेली मुक्ता साळवे धर्माबाबत प्रश्न विचारू लागली. म्हणजेच अस्पृश्य समाजातील माणसेही सज्ञान होऊ लागली. आम्ही कुठे आहोत, माझे जीवन कसे आहे ? मी ही माणूस आहे, मलाही जगण्याचा, शिक्षण घेण्याचा अधिकार आहे असे अनेक प्रश्न स्वतःला विचारून या व्यवस्थेला प्रश्न विचारू लागली. अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध झगडू लागली. न्याय मागू लागली. शिक्षण घेऊ लागली. खेड्यातली सगळी माणसं शिक्षणासाठी शहराकडे धावू लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीमध्ये दाखल होऊ लागली. या व्यवस्थेला जबरदस्त हादरे देऊ लागली. आपले प्रश्न मांडू लागली. आपले अस्तित्व शोधू लागली. हे जसे जसे शिक्षण घेऊन मोठे होऊ लागले, अधिकारी पदावर बसू लागले, लाल दिव्याच्या गाडीत फिरू लागले, कोणी आमदार तर कोणी खासदार तर कोणी मंत्री होऊ लागले. तशी तशी या उच्चवर्णीयांच्या बुडाखालची वाळू सरकू लागली. त्यांचे माथे भडकू लागले. त्यांचा झालेला होत असलेला विकास त्यांना पाहू वाटे नसा झाला. त्यांनी या देशातला रचलेला खोटा इतिहास ही सगळी शिकलेली माणसे सत्याने सांगू लागली. अभ्यास करू लागली. आणि त्यांच्या मर्मावरच बोट ठेवायला लागली. परंतु या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले संविधान आहे. संविधानामुळे स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणात खूप मोठ्या प्रमाणावर प्रगती झालेली दिसून येते. गाव तिथे शाळा झाली. सर्व शिक्षा अभियान, अंगणवाड्या, एक शिक्षकी शाळा सुरू करण्यात आल्या. विद्यापीठ शिक्षण आयोग, कोठारी व इतर आयोग ही नेमण्यात आले आणि त्याद्वारे शिक्षणाची प्रगती साधली गेली. त्यामुळे शिक्षण दिवसा,रात्री,वाड्या वस्तीवर,खेड्यापाड्यावर आदिवासी भागांमध्ये सुरू झाले. 1986 च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने वैज्ञानिक, तांत्रिक, आर्थिक क्षेत्रात सक्षम बनवून प्रगतीकडे झेप घेता येईल याकडे लक्ष दिले. उच्च शिक्षणात सर्वांना संधी दिली. या संविधानात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय ही मूल्य दिली आहेत. त्यामुळे प्रत्येक माणूस विकास करू लागला. देश संविधानावर चालत असल्यामुळे आणि ही सर्व बहुजनातली माणसं शिकू लागल्यामुळे अधिकार गाजवू लागली. आपले हक्क मागू लागली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की,"हक्क हे मागून मिळत नाहीत तर ते झगडून घ्यावे लागतात"अगदी त्याचप्रमाणे ते आपल्या हक्कासाठी झगडायला लागले. नेमके हेच उच्चवर्णीयांना पहावेनासे झाले. शिक्षणातही आणि नोकरीतील वरच्या पदावर ही ही सगळी माणसे शिक्षणाच्या माध्यमातून आणि मेरिट लिस्ट च्या माध्यमातून पुढे जाऊ लागली. त्यावेळी त्यांचा प्रचंड मोठ्या प्रमाणावर जळफळट होत असे. पण ते काहीच करू शकत नव्हते कारण सत्ता त्यांच्या हातामध्ये नव्हती. हळूहळू जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उधारीकरणाने मानवी जीवनात प्रवेश करायला सुरुवात केली. त्याचा परिणाम मानवी जीवनावर आणि मानवी विकासावर होऊ लागला. गुणवत्तेच्या नावावर वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षण व्यवस्थेत व उच्च शिक्षण व्यवस्थेत वेगवेगळे प्रयोग लागू करायला सुरुवात केली.नेट,सेट,पेट,गेट,टीईटी, अशा परीक्षा व नॉन ग्रँड, सीएचबी, शिक्षण सेवक, कॉन्ट्रॅक्ट बेसिस, असे वेगवेगळे धोरण शिक्षण पद्धतीत सुरू केले. नानाविध या शिक्षण व्यवस्थेत अडचणी आणू लागले. जेणेकरून हा बहुजन समाज शिक्षणापासून कसा वंचित राहील हेच पाहू लागले. परंतु त्यामध्येही हा समाज सरस ठरू लागला. त्यामुळे त्यांचा जीव भांड्यात गुदमरल्यासारखा होऊ लागला. गेल्या अनेक वर्षापासून सत्ता त्यांच्या हातात आली आणि त्या सत्तेचा अगदी मनापासून बहुजनांचे खच्चीकरण करण्यासाठी ते उपयोग करू लागले. शिक्षण, आरक्षण, राजकारण, खाजगीकरण, नोक-या बंद करणे, नोकर भरती बंद करणे, अग्नी वीर योजना आणणे, जिल्हा परिषद शाळा बंद करणे, महागाई वाढवणे,डी.एड.बंद करणे, लोकशाहीची मोडतोड करणे, भारतीय संविधान बदलण्याची भाषा करणे अशा अनेक गोष्टीतून ते बहुजनांचे शोषण, खच्चीकरण, छळ करू लागले. हे भयानक वास्तव आहे.



अशा अनेक गोष्टी भयानक असताना पुन्हा 2020 पासून नवीन शैक्षणिक धोरण लागू करण्याचे प्रयत्न जोरदारपणे सुरू केले आहेत. त्या संदर्भातील अनेकांना त्याची जाण नाही. ते लवकर बाहेर येऊ दिले नाही. गपचूप गपचूप लागू करण्याचा प्रयत्न केला आहे. आता यामधून विद्यार्थ्यांना व्यवसाय मिळणार, तू कधीही शिक्षण घेऊ शकणार, त्याला कधीही डिग्री मिळणार, तो स्वतःचा व्यवसाय करण्यास लायक होणार अशा प्रकारच्या वल्गना करून या शिक्षण व्यवस्थेचा खेळखंडोबा होण्यास सुरुवात झाली आहे. अगोदरच या व्यवस्थेत त्यांनी चौथी, सातवी, दहावी या वर्गाचे बोर्ड बंद केले आहेत. उच्च शिक्षणातील एम्.फील पदवी रद्द केली आहे. त्यांना पुढच्या वर्गात ढकलले जात आहे. नापास झाले तरी त्यांच्या परीक्षा पुन्हा घेण्यासाठी परवानगी दिली जात आहे. त्यांना बळजबरीने पास केले जात आहे. शिक्षणात जो कडकपणा आणि शिस्तपणा होता तो सगळा बरबाद करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे वाईट आहे. शिक्षणाच्या संदर्भात 26 फेब्रुवारी 2023 च्या दैनिक दिव्य मराठी रसिक पुरवणी माजी कुलगुरू डॉ. विजय पांढरीपाडे म्हणतात की," खाजगीकरणाने शिक्षणाचा दर्जा व स्पर्धेने गुणवत्ता वाढेल, अशी एक भ्रामक समजूत होती. पण इथे शिक्षणसम्राट, राजकारण्यांचा शिरकाव झाल्यामुळे गुणवत्तेचे दिवास्वप्न पूर्ण होणे शक्यच नव्हते. विद्यार्थी पालकांकडून भरमसाठ शुल्क घ्यायचे, जाहिरातबाजी करायची; पण प्राध्यापकांच्या नेमणुका, अद्ययावत प्रयोगशाळा, संगणकासह इतर सुविधा पुरवण्याच्या आणि मुख्य म्हणजे शिकवण्याचा दर्जा सुधारण्याच्या बाबतीत मात्र आनंदी आनंद असल्याचे दिसते. सरकार दरबारी वजन असलेल्यांची शिक्षण क्षेत्रात दादागिरी चालते. हे सारे उघड्या डोळ्यांनी बघणे एवढेच सामान्य नागरिकांच्या, पालकांच्या हाती उरले आहे. या स्थितीमुळे जागतिक मानांकन स्पर्धेत आपली विद्यापीठेच नव्हे तर आयआयटी सारख्या संस्था ही मागे पडत आहेत. सरकारी नियमानुसारच बहुतांश निर्णय होत असल्याने उत्तम प्राध्यापक निवडीचे स्वातंत्र्य नाही. विद्यार्थ्याला विषय निवडीचे स्वातंत्र्य नाही. शिक्षकाला हव्या त्या पद्धतीने मूल्यमापन करण्याचे स्वातंत्र्य नाही. विद्यापीठासाठीच्या नियम,कायद्यात लवचिकता नाही. अशा परिस्थितीत नवे शैक्षणिक धोरण कसे राबवायचे असा प्रश्न निर्माण होऊ शकतो."

खरंतर नवीन शैक्षणिक धोरणात कौशल्यावर आधारित शिक्षण राहणार आहे. जेणेकरून शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी कोणता ना कोणता तरी व्यवसाय करणे गरजेचे आहे. असे शिक्षण त्याला दिले गेले पाहिजे ही भूमिका नवीन शैक्षणिक धोरणाची आहे असे सांगितले जाते. परंतु त्या विद्यार्थ्यांनी कलेक्टर, प्राध्यापक, तहसीलदार,शिक्षक, पोलीस अधीक्षक, साहित्यिक, विचारवंत, वैज्ञानिक असे होता कामा नये. हेच यामधून त्यांना सुचवायचे आहे की काय असे दिसून येते आणि जुन्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेनुसार ज्यांना जी जी कामे दिली आहेत ती ती कामे त्यांनीच करावीत की काय ? अशी शिक्षण व्यवस्था निर्माण होते आहे की काय ही भीती वाटत आहे. अनेक बड्या उद्योग समूहांनी खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यासाठी रस दाखवला आहे. या खाजगी विद्यापीठांमध्ये राखीव जागा नसणार आहेत.फी वर नियंत्रण राहणार नाही. गरिबांच्या मुलांना शिक्षण मिळणार नाही. पूर्वीच्या काळात जे शिक्षण दिले जायचे त्याच वैदिक शिक्षणाची, मंत्र तंत्र शिक्षणाची काही ठिकाणी सुरुवात करण्यात येत असल्याच्या बातम्याही झळकू लागल्या आहेत. एवढ्या प्रगतीपथावर आणलेला हा देश पुन्हा मागे जातो की काय अशी भीती वाटायला लागली आहे. त्यामुळे सर्वांनीच सावध राहणे काळाची गरज निर्माण झाली आहे. आत्ता आत्ता कुठे या नवीन शैक्षणिक धोरणाविषयी चर्चासत्राचे आयोजन केली जात आहेत. त्यामधून या नवीन शैक्षणिक धोरणाची अफलातून माहिती समोर येत आहे. हे नवीन शैक्षणिक धोरण न परवडणारे आहे असाच सूर निघताना दिसतो आहे. काहींच्या मते तर या शिक्षण व्यवस्थेत पुन्हा हे चातुर्वर्ण्यव्यवस्था आणु पाहत आहेत. मनुस्मृतीचे विचार डोकावत आहेत. या नवीन शैक्षणिक धोरणात आत्ता शिक्षक होण्यासाठी बारावीनंतर चार वर्ष व पदवीनंतर दोन वर्ष घालवावी लागणार आहेत. जे की पहिल्या अभ्यासक्रमाच्या वेळी शिक्षक होण्यासाठी डी.एड. चे दोन वर्षे व बि.एड. चे एक वर्ष घालावीवी लागत होते. शैक्षणिक धोरणावर सरकारचे नियंत्रण कमी राहणार आहे व खाजगी शिक्षण संस्थेचे नियंत्रण जास्त राहणार आहे असेही म्हटले जाते आहे. यावरून आपल्या लक्षात यायला लागते की खाजगी शिक्षण संस्थेत संस्था चालक शिक्षक व प्राध्यापक होण्यासाठी तीस तीस व पन्नास पन्नास लाख रुपये घेत आहेत या नवीन शैक्षणिक धोरणात हजारो विद्यापीठे व हजारो महाविद्यालय निर्माण करण्याची संकल्पना आखली आहे. म्हणजेच खाजगी संस्थांना खूप मोठ्या प्रमाणावर संधी दिली आहे. त्यामुळे गरिबांना, खेड्यापाड्यातल्यांना दर्जेदार शिक्षण कसे मिळणार ? हा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहणार नाही. नवीन शैक्षणिक धोरणाने शिक्षणाचा कशा पद्धतीने बाजार मांडला आहे आणि शिक्षणाचे वाटोळे करण्याचा प्रयत्न केला आहे. असे म्हटले जाते की या नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थी हा व्यावसायिक कौशल्य आत्मसात करून किंवा त्याच्या व्यावसायिक कौशल्याचा विकास होऊन तो नोकरी मागणारा नाही तर इतरांना नोकरी देणारा होईल असेही म्हटले जाते. म्हणजे विद्यार्थ्याला व्यवसायामध्येच प्रचंड मोठ्या प्रमाणावर गुंतवले जाणार आहे असेच दिसते. जुने व्यवसाय ज्यांनी ज्यांनी केले तेच व्यवसाय म्हणजे बारा बलुतेदारी पद्धत पुन्हा निर्माण करणार की काय अशा प्रकारचा प्रश्नही उपस्थित होतो. खरे तर कौशल्यावर आधारित शिक्षण या नावाने फसविले जाते की काय ? असेही वाटायला लागते कारण याही अगोदर कौशल्यावर आधारित काही कोर्सेस होतेच ज्याला जे आवडत असे ते करून व्यवसायामध्ये उडी घेत असे.पहिली तीन वर्षाची पदवी मिळत असे. आता मात्र एक वर्ष शिक्षण घेऊनही तुम्हाला थांबता येणार आहे. मग पुन्हा तुम्ही दोन वर्षांनी ही प्रवेश घेऊ शकता. अशा सुविधेमुळे विद्यार्थ्यांची अभ्यासाची लिंक तुटून जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थी ना घर का ना घाट का होण्याची शक्यता आहे. अशा नानाविध पद्धतीमुळे अनेकांच्या चांगल्या जीवनात विष कालवणे सुरू आहे. शिक्षणाअभावी माणूस गुलाम होतो.त्यामुळे आत्ता सर्वांनी जागे होऊन सतत जागृत राहून अशा अन्यायकारक व्यवस्थेला जाब विचारून ते बदलायला भाग पाडणे गरजेचे आहे. शिक्षणव्यवस्थेतून सरंजामशाही व भांडवलशाही निर्माण होता कामा नये. कल्याणकारी राज्याची निर्मिती होणं ही काळाची गरज आहे. हे लक्षात घेऊनच शासन व्यवस्थेने व राज्यकर्त्यांनी शासन चालवणे हे महत्त्वाचे आहे.



# परतूर माहेश्वरी समाजाच्या तालुक़ा अध्यक्षपदी पोरवाल तर शहर अध्यक्ष झंवर

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** माहेश्वरी समाजाच्या नूतन कार्यकारिणी ची निवड प्रक्रिया नुक़तीच पार पडली. यात परतूर तालुक़ा अध्यक्षपदी राजेंद्र पोरवाल यांची तर शहर अध्यक्ष गोविंद झंवर यांची सर्व सहमतीने बिनविरोध निवड करण्यात आली.

या सोबत तालुक़ा कार्यकारिणी वर उपाध्यक्ष - नंदकिशोर मंत्री , आष्टि सचिव - महेश लाहोटी, सहसचिव- रवी मुंदड़ा संगठन मंत्री - अजीत पोरवाल ,कोषाध्यक्ष - सत्यनारायण राठी , यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शहर कार्यकारिणी वर उपाध्यक्ष गणेश जेथलीया, सचिव- बालाजी चांडक ,सहसचिव - प्रशांत सोमानी, संगठन मंत्री- शिवप्रसाद मुंदड़ा, कोषाध्यक्ष- रवी सोमानी यांची निवड केली गेली. या प्रक्रियेत निवडनूक अधिकारी अखिल भारतीय माहेश्वरी सभेचे सदस्य ओमप्रकाश मंत्री हे होते. या बैठकित संजय दाड, शिवजी मामा दरगड, लक्ष्मीनारायण मानधना, प्रसाद झंवर, राजेश मंत्री , राधेश्याम मुंदड़ा, जगदीश झंवर श्याम सोनी ,यांची प्रमुख उपस्थिति होती.

# सांगोला नगरपरिषदेची मालमत्ता कर, पाणीपट्टी, इमारत व जागा भाडे यांची विक्रमी वसुली

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** नगरपरिषदेमार्फत आर्थिक वर्ष 2022-2023 च्या मालमत्ता कर, पाणीपट्टी, इमारत व जागा भाडे यांच्या एकूण 10 कोटी 58 लाख मागणीपैकी तब्बल 7 कोटी रुपये एवढी करांची विक्रमी वसुली करण्यात आली, अशी माहिती सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी दिली.
मालमत्ता कर (2022-2023) एकूण मागणी- 4 कोटी 90 लाख एकूण वसुली - 3 कोटी 10 लाख पाणीपट्टी (2022-2023)एकूण मागणी- 3 कोटी 82 लाख एकूण वसुली - 2 कोटी 90 लाख इमारत व गाळा भाडे (2022-2023)
एकूण मागणी - 1 कोटी 86 लाख
एकूण वसुली - 1 कोटी
कोरोनाच्या पार्श्वभूमीवर मागील 2 वर्षे नागरिक, व्यापारी हे नाजूक अशा आर्थिक परिस्थितीतून जात होते.त्यामुळे नगरपरिषदेमार्फत कर वसुलीसाठी विशेष अशी वसुली मोहीम घेण्यात आली नव्हती.स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने विशेष वसुली मोहीम राबवून जास्तीत कर वसुली होणे आवश्यक असते.त्यामुळे कोरोना महामारीला तोंड देऊन सर्व नागरिक,व्यापारीवर्ग स्थिरस्थावर झाल्यानन्तर या वर्षी नगरपरिषदेमार्फत वसुलीसाठी विशेष वसुली मोहीम हाती घेण्यात आली होती. या वसुली मोहिमेअंतर्गत कर विभागाकडील 16 कर्मचारी तसेच पाणीपुरवठा विभागाकडील कर्मचारी यांचेमार्फत थकबाकीदार यांना लक्ष करून कर भरणा करण्याबाबत नोटिसा देणे, वारंवार पाठपुरावा करणे ,वेळप्रसंगी पाणीपुरवठा खंडित करणे, गाळे सिल करणे, मालमत्तांना जप्तीपूर्व नोटिसा देणे यासारखी कारवाई करण्यात आली .

नगरपरिषदेकडून सुरू असलेल्या या विशेष वसुली मोहिमेला सांगोला नगरपरिषद हद्दीतील नागरिक व व्यापारी वर्ग यांनी देखील तितक्याच चांगल्या पद्धतीने प्रतिसाद दिला.एक सुजाण नागरिक म्हणून सर्वांनी कर भरणा करून नगरपरिषदेस सहकार्य केले असून अद्यापही बरेचशे थकबाकीदार असून त्यांचेमार्फत कर भरणा करणेसाठी नगरपरिषद प्रयत्नशील आहे. थकबाकी रकमेवर महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मधील तरतुदीनुसार मासिक 2% दंडाची आकारणी केली जात असल्याने थकबाकीदारांनी लवकरात लवकर आपला थकीत कर भरणा करावा, असे आवाहन ही याद्वारे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांनी नागरिकांना केले.

सदर वसुली मोहीम यशस्वी राबवून विक्रमी वसुली करण्यासाठी मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यालयीन अधीक्षक व लेखापाल श्री. विजयकुमार कन्हेरे,कर निरीक्षक तृप्ती रसाळ,सहा.मालमत्ता पर्यवेक्षक स्वप्निल हाके,पाणीपुरवठा अभियंता श्री. तुकाराम माने, लेखापरीक्षक श्री. जितेंद्र गायकवाड,सेवानिवृत्त श्री. सूर्यकांत रणदिवे, पाणीपुरवठा व कर विभागाकडील सर्व कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

# खंडाळ्यात महावीर जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** जैन समाजासाठी महावीर जयंती अत्यंत महत्त्वाची असून हा दिवस खंडाळा येथे जैन धर्माचे महान तीर्थंकर यांचा जन्मदिवस म्हणून साजरा करण्यात आला. त्यांचा जन्म शुक्ल पक्षामध्ये चैत्र महिन्याच्या तेराव्या दिवशी झाला होता म्हणून जैन धर्मातील महान तीर्थंकराचा जन्मदिवस म्हणून महावीर जयंती साजरी केली जाते.हा दिवस ४ एप्रिल २०२३ रोजी खंडाळा परिसरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रवीण संचेती, पुखराज बाफना, संतोष कासलीवाल, गौतम संचेती,मांगीलाल संचेती, दीपक संचेती, जितू बाफना, सचिन बाफना, कांतीलाल कासलीवाल, बालचंद संचेती, प्रफुल लोढा, पवन बाफना, नरेंद्र कासलीवाल, गोरख शिंदे, अशोक पवार, रामेश्वर पारीख, राजेंद्र लोहाडे, महावीर पाटणे, रवींद्र कासलीवाल, सचिन कासलीवाल, अनिल झांजरी,संतोष संचेती, सुनिल संचेती, महावीर कासलीवाल,प्रभाकर सोनार, रवींद्र पाटणे, मनोज सोनवणे, गुणवंत संचेती, रोशन संचेती, विशाल बाफना, निलेश कासलीवाल, नितीन पहाडे, संजीव पहाडे, मनोज पहाडे,विशाल ठोळे, गौतमप्रसादी अलका प्रकाश कासलीवाल भाषण नवले सर, मनोज सोनवणे सर, पूनम बाफना, मयुरी ठोळे, पूनम बाफना, सुनील संचेती, दीप बाफना आदी जैन समाज बांधव व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देवगाव रंगारीत महावीर कथेला प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी  येथील श्री १००८ आदिनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र लाल मंदिर येथे भगवान महावीर यांच्या २६२२व्या जन्मजयंती सोहळ्यानिमित्त पाच दिवस भगवान महावीर यांच्या जीवनावर आधारित भगवान महावीर संगीतमय कथेस शनिवारी सुरवात झाली.या कथेची सांगता आज दि.४/४/२०२३ बुधवारी रोजी होणार आहे. धर्मतीर्थ प्रणेते प्रज्ञायोगी आचार्य गुप्तीनंदी महाराज, प्रज्ञायोगी आचार्य सुयशगुप्ती, चंद्रगुप्ती महाराज हे सर्व जण या उपक्रमात कथा सांगत आहेत.दररोज संध्याकाळी सात वाजता कथेला सुरुवात होते. कार्यक्रमाचे उद्घाटन गोकुळ गोरे, कमलाकर चौधरी, सुभाष मगर यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून उद्घाटनानंतर प्रमुख श्रोत्याचा मान नितीन पापडीवाल आणि स्मिता पापडीवाल यांना मिळाला. रविवारी प्रमुख श्रोता म्हणून हेमंत पांडे व वैशाली पांडे यांना मान मिळाला.रविवारी नाशिक जिल्हा परिषदेचे सदस्य महेंद्र काले, अनकाई येवला येथील सरपंच बाबूलाल कासलीवाल अंकाईवाले, संजय पापडीवाल, हनी जैन, राजकुमार गंगवाल यांच्यासह परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रज्ञायोगी, जैनाचार्य आचार्य गुप्तीनंदी महाराज, प्रज्ञाश्रमण आचार्य सुयशगुप्ती महाराज, प्रज्ञाश्रमण आचार्य चंद्रगुप्ती महाराज, विमलगुप्ती महाराज, क्षुल्लिका धन्यश्री माता आदी संघ वास्तव्यास असून, त्यांच्या उपस्थितीत आज, मंगळवारी भगवान महावीर जयंतीनिमित्त भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. भगवंताचा पंचामृत अभिषेक, आचार्यसंघाचे प्रवचन, संध्याकाळी महाआरती करण्यात येणार आहे.

## वैजापुरात भगवान महावीर जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर येथे दि.४/४/२०२३ रोजी जियो और जिने दो,भगवान महावीर की जय,अशा जय घोषात भगवान महावीरांच्या प्रतिमेची गांधी मैदान येथील जैन स्तंभ पासून प्रथम सायकल रॅली व नंतर साडे आठ वाजता भगवान महावीर यांच्या प्रतिमेची भव्य रॅली काढण्यात आली भगवान महावीरांच्या जगा आणि जगू द्या चा संदेश, अहिंसाचा संदेश शहरवासीय यांच्यापर्यंत सकल जैन समाज महिला,पुरुष, तरुण, तरुणी मुले मुली यांनी दिला. या रॅलीचा शुभारंभ मर्चंट बँक चेअरमन विशाल संचेती, सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत, प्रकाश शेठ बोथरा, संतोष बोथरा, इंदरशेठ बोथरा, प्रफुल संचेती, निलेश पारख, राजेंद्र पारख, जैन शाळेचे राजू संचेती, बागमार, डॉ. संतोष गंगवाल, मर्चंट बँक मॅनेजर कोठारी यांच्या उपस्थितीत  झाला. यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम झाले. या प्रसंगी नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी उपस्थित होत्या.





## सिंदफणा पब्लिक स्कूलच्या शिक्षकांची नाशिक-शिर्डी येथे अभ्यास सहल

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** येथील विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलच्या शिक्षकांची शैक्षणिक अभ्यास सहल नाशिक-शिर्डी येथे संस्थेच्या सचिव मंगलाताई सोळंके आणि उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील शैक्षणीक दृष्टया अग्रगण्य असलेली व सर्व समावेशक शिक्षण देणारी संस्था अशी ओळख असलेली सिंदफणा पब्लिक स्कूलने यावर्षी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी शैक्षणिक अभ्यास सहल काढून एक आगळावेगळा आदर्श समाजासमोर निर्माण केला आहे. आपल्या दैनंदिन कामकाजामधून थोडा वेळ अभ्यासाबरोबरच प्रेक्षणीय स्थळांचाही आनंद घेता यावा यासाठी तीन दिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन नाशिक-शिर्डी परिसरामध्ये दिनांक ३१ मार्च ते ३ एप्रिल दरम्यान करण्यात आले होते.

या शैक्षणिक सहलीची सुरुवात त्र्यंबकेश्वर येथील ज्योतिर्लिंग दर्शनाने झाली. त्यानंतर मोहाडी येथील सह्याद्री फार्म येथे भेट देऊन त्या ठिकाणी फळ भाजी प्रक्रिया, पॅकिंग आणि विक्री या विषयी सविस्तर माहिती मिळविली. सह्याद्री फार्म येथे भेटीची परवानगी माजलगाव सहकारी ग्राहक संस्थेचे व्यवस्थापक भगवानराव शेजुळ यांच्या प्रयत्नाने मिळाली. त्यानंतर हिंदुस्थान एरनॉटिक्स लिमिटेड प्रगती एरोस्पेस संग्रहालय, ओझर नाशिक येथे भेट देण्यात आली. कंपनी द्वारे निर्माण केल्या जाणाऱ्या सर्व  लढाऊ विमानांची माहिती या संग्रहालयात ठेवण्यात आली आहे. मराठवाड्याचे सुपुत्र तथा हिंदुस्थान एरनॉटिक्स लिमिटेड येथे अभियंता म्हणून कार्यरत असलेले गजानन फासाटे यांनी सर्वांचे स्वागत करून प्रगती संग्रहालयात मिग-२१, मिग-२७, सुखोई -३० इत्यादी भारताच्या लढाऊ विमानांची माहिती व कंपनीच्या इतर कामांची सविस्तर माहिती त्यांनी दिली.सहलीच्या दुसऱ्या दिवसाची सुरुवात शिर्डी येथे साईबाबांचे दर्शन घेऊन झाली. त्यानंतर पालखी विसावा येथे असलेल्या पक्षी संग्रहालयाला भेट देऊन  विविध रंगाचे सुंदर पक्षी, प्राणी, नैसर्गिक औषधी वनस्पती यांची माहिती मिळविली. शिर्डी येथील सहलीसाठी शाळेचे माजी शिक्षक मधुकर बावके, सविता बावके आणि  शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. प्रितेश बावके यांचे महत्वपूर्ण योगदान लाभले.

ही शैक्षणिक सहल यशस्वी केल्याबद्दल  मा.आ.प्रकाश दादा सोळंके, संस्थेचे अध्यक्ष मंगलाताई सोळंके, शाळेच्या समन्वयक नीला देशमुख यांनी अभिनंदन केले. सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर शेख व उपप्राचार्य राहुल कदम,  सहलीचे समन्वयक संतोष पालकर, विजय फासाटे, पुरुषोत्तम सोळंके, अजय सावंत, डॉ.वरुण तौर यांनी ही सहल यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.




# काँग्रेसशी एकनिष्ठ असलेले झनक घराणे

आधुनिक केसरी

**बडा अजीब होता है राजनीती का रंग वही दुश्मन बनता है,जो सबसे करीब होता है राजकारण म्हणजे बदमाशांचा अड्डा असे म्हटल्या जाते.यामुळे अनेक चांगली माणसं राजकारणापासून चार हात दूर राहतात.अलीकडच्या राजकारणाने तर कमालच केलेली दिसते.आयाराम- गयाराम ची संख्या दररोज बघायला मिळते. अशाही परिस्थिती स्वातंत्र्यपूर्व काळापासून तर आजपर्यंत एक परिवार असा आहे की ज्या परिवाराने माणुसकी जोपासत जनसेवेचे कंकण बांधून काँग्रेस पक्षाप्रति आपली निष्ठा आजतागायत कायम ठेवत सर्वसामान्यांचे नेतृत्व केले आणि शेतकरी-शेतमजूर गोरगरिबांना हा परिवार आपला परिवार वाटतो हेच झनक परिवाराच्या समाजकारणाचे आणि राजकारणाचे गमक आहे.**






सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080



झनक परिवार जवळून न्याहाळता- अनुभवता आला. स्व गोपाळराव झनक,काँग्रेसचे सक्रिय पदाधिकारी व काँग्रेसचे नेते होते तर मेडशी ( आताचा रिसोड विधानसभा मतदारसंघ ) चे तब्बल ४ वेळा प्रतिनिधित्व केलेले ऍड रामराव झनक, याच मतदारसंघाचे ४ वेळ प्रतिनिधित्व केलेले स्व. सुभाषराव झनक आणि आता रिसोड मतदारसंघाचे तिसऱ्यांदा प्रतिनिधित्व करत असलेले अमित झनक अशा 4 पिढ्यांनी रिसोड मतदारसंघातील लोकांची सेवा करत त्यांचे नेतृत्व केले आहे.स्व गोपाळराव झनक यांनी कधी विधानसभा लढविली नाही की ते आमदार नव्हते मात्र त्याकाळात देखील काँग्रेसचे शेतीमंत्री ला आपल्या गावी आणून काँग्रेसची परिषद आयोजित केली होती.तर संत गाडगे महाराज यांचे मांगुळ झनक ता रिसोड जि वाशीम येथे कीर्तनाचे आयोजन केले तर तब्बल 150 पोत्यांचा भंडारा ( महाप्रसाद ) कार्यक्रम आयोजित केला होता,त्या बाबतचे त्याकाळातील छापीव पत्रक देखील उपलब्ध आहेत.

काँग्रेसच्या याच विचारात वाढलेले स्व गोपळराव झनक यांचे चिरंजीव ऍड रामराव झनक हे वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वातील सरकार मध्ये सर्वात जास्त शिकलेले आमदार होते. ऍड रामराव झनक हे एम एस सी एल एल एम होते याशिवाय ते गोल्ड मेडल प्राप्त होते.त्याकाळी ते राष्ट्रीय पातळीवरील फूटबॉल पटू होते.

पांढरेशुभ्र धोतर, पांढरा सदरा,डोक्यावर टोपी असा पेहराव असलेल्या आणि उच्चशिक्षित असलेल्या ऍड रामराव झनक यांचं राहणं-वागणं बोलणं अतिशय साधं होतं. हा माणूस एव्हडे शिक्षण घेतलेला असावा असे देखील कुणाला कधी वाटले नाही.कारण शेतकऱ्याशी आणि शेतमजुरांशी ते त्याच्या बोली भाषेत संवाद साधायचे. तब्बल 4 वेळा सलग आमदार राहूनही त्यांच्या जवळ स्वतःच्या मालकीची चार चाकी देखील नव्हती.अकोला केंद्रीय सहकारी बँकेचे वाहनच ते वापरायचे. 4 वेळा आमदार होऊनही त्यांनी त्यांच्या मूळ खेडेगावी च राहणे पसंत केले.तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी आपले घर हलविले नाही आणि त्याच प्रमाणे नंतर देखील स्व सुभाषराव झनक, श्री अमित झनक यांनी देखील आपल्या खेडेगावातून मुक्काम हलविला नाही.ग्रामीण भागाशी आपली नाळ त्यांनी कायम जोडून ठेवली.

ऍड रामराव झनक यांचा आमदार म्हणून कार्यरत असतांना कर्क रोगाने मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूनंतर कमावलेली माणसं आणि डोक्यावर कर्ज हीच काय ती संपत्ती मागे उरली होती.

ऍड स्व रामरावजी झनक यांच्या मृत्यूनंतर त्यांचे ज्येष्ठपुत्र स्व आ सुभाषराव झनक यांचे वय कमी होते.त्यामुळे त्यांना पोटनिवडणुक लढविता आली



नाही मात्र त्यानंतरच्या निवडणुकीत त्यांनी विजय खेचून आणला व ते आमदार झाले.

स्व सुभाषराव झनक यांचं व्यक्तिमत्व अतिशय साधं.शेतकऱ्यांशी-शेतमजूर यांच्यासह सर्वसामान्य गोरगरीब लोकांशी त्यांची नाळ जुळलेली असल्याने लोकांनी त्यांना बळीराजा ही पदवी बहाल केली. स्वतःच्या नावावर शिक्का मारून घेणारी ही पदवी नव्हती तर लोकांनी मनातून दिलेली ही पदवी व त्यामाध्यमातून त्यांच्या कार्याचा केलेला गौरवच होता. जनावरे सांभाळणाऱ्या गुराखी सोबत देखील ते अदबीने बोलायचे. 3 वेळा सलग विजयी झाल्यानंतर चवथ्या निवडणुकीत त्यांचा भाजपा उमेदवाराकडून पराभव झाला.10 वर्ष आमदार नसतांना देखील सर्वसामान्यांच्या सुखदुःखात ते सातत्याने सहभागी राहले.जनसंपर्क कधी तुटू दिला नाही.आणि 10 वर्षाच्या राजकीय विजनवासानंतर 2009 च्या निवडणुकीत ते रिसोड विधानसभा निवडणुकीत विजयी झाले.

स्व सुभाष झनक युवक काँग्रेसचे राज्याचे उपाध्यक्ष असतांना त्यांच्या नेतृत्वातील युवक काँग्रेसमध्ये अशोकराव चव्हाण पदाधिकारी होते. स्व शंकरराव चव्हाण आणि स्व ऍड रामरावजी झनक यांच्यात जवळचे ऋणानुबंध, आणि याच ऋणानुबंधाचा धागा स्व सुभाषराव झनक आणि माजी मुख्यमंत्री सुभाषराव झनक यांच्यात कायम राहीला.त्याचाच परिणाम म्हणून अशोकराव चव्हाण यांनी 2009 ला आपल्या मंत्रीमंडळांत महिला व बालविकास खात्याचे कॅबिनेट मंत्री केले.आणि विशेष म्हणजे अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री केलेले असतांना स्वतःच्या नांदेड जिल्ह्याचे पालकत्व स्व सुभाषराव झनक यांच्याकडे दिले.

अशोकराव चव्हाण यांच्या मंत्रिमंडळातील स्व झनक हे असे एकमेव मंत्री होते की,ज्यांच्याकडे 2 जिल्ह्याचे पालकमंत्री पद होते.आणि त्यातल्या त्यात मुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने त्या मंत्रिमंडळात त्यांचे वेगळेच वजन होते.

आदर्श प्रकरणी अशोकराव चव्हाण यांना मुख्यमंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला,त्यानंतर पृथ्वीराज चव्हाण यांना नेता म्हणून निवडल्या गेले,परंतु मला तुमच्या मंत्रिमंडळात समाविष्ट करा असा एकही शब्द त्यांनी काढला नाही.अशोकराव चव्हाण साहेबच मुख्यमंत्री नसतील,तर आपण काय मंत्री व्हावे असे म्हणत त्यांनी नकार दिला.

यादरम्यान अशोकराव चव्हाण यांचा सारंग 5 या स्व झनक साहेबांच्या बंगल्यावर कॉल आला,मी तिथेच असल्याने आणि स्व सुभाषराव झनक यांचा पी ए असल्याने तो कॉल मीच घेतला व साहेबांना चव्हाण साहेबांचा कॉल असल्याचे सांगितले. त्यावेळी अशोकराव चव्हाण यांनी त्यांना पृथ्वीबाबा चव्हाण यांच्याशी संपर्क साधा असे सांगितले.पण साहेब जिथे तुम्हीच नाही तिथे मी काय करू अशा शब्दात त्यांनी आपली निष्ठा दाखवून दिली.

ते आमदार असतांनाच 28 ऑक्टोबर 2013 ला त्यांचे निधन झाले आणि 6 महिन्यातच लागलेल्या 2014 च्या पोटनिवडणुकीत आ अमित झनक यांनी वादळात देखील आपल्या विजयाचा दिवा पेटविला.

लोकसभा निवडणुक दरम्यान केवळ रिसोड विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुक झाली होती.संबंध देशात मोदी लाट असतांना त्या लाटेला थोपविण्याचे काम आ अमित सुभाषराव झनक यांनी केले.

त्यानंतर आलेल्या निवडणुकीत काँग्रेसचा तिरंगा आ अमित झनक यांनी तिसऱ्यांदा फडकवला. शरद पवार काँग्रेस मधून बाहेर पडत राष्ट्रवादी स्थापन केली,त्यावेळी स्व सुभाषराव झनक यांनी राष्ट्रवादीची घड्याळ हातात बांधावी अशी इच्छा शरद पवार यांनी व्यक्त केली,मात्र सुभाष झनक साहेबांनी नम्रपणे नकार देत काँग्रेस मध्येच राहले.आ अमित झनक यांनीही आपल्या पक्षात यावं अस काहींना वाटलं होतं,आ अमित झनक यांनी आपण शेवटपर्यंत काँग्रेस मध्येच राहणार असल्याचे सांगून काँग्रेसप्रति आपली निष्ठा व्यक्त केली.

आजोबा स्व ऍड. रामराव झनक, वडील स्व. सुभाषराव झनक यांच्या प्रमाणे तालुक्याच्या ठिकाणी वास्तव्य न करता मांगुळ झनक येथेच वास्तव्य करत असलेल्या अमित झनक यांनी आपल्या पूर्वीच्या पिढ्यापेक्षा दमदार वाटचाल करत लोकांचा, तरुणाई चा विश्वास संपादित केला आहे.उच्चशिक्षित असलेल्या अमित झनक यांनी देखील आपल्या डोक्यात सत्तेची हवा घुसू दिली नाही.सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेल्या अमित झनक यांचे पाय आजही जमिनीवर आहेत. आणि झनक परिवाराची हीच विशेषता असल्याने या परिवारावर मागील 4 पिढ्यांपासून रिसोड मतदार संघातील जनता अमाप प्रेम करते आहे.अशी चांगली माणसं आजही राजकारणात असल्याने राजकारण टिकून आहे.

**जिस समाज में एक अच्छा नेता नहीं होगा, उस समाज का विकास मुश्किल ही होगा**



## पैठण शहरात महावीर जयंती उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** भगवान महावीर स्वामींच्या जन्म कल्याण महोत्सवाच्या आयोजनात जैन समाजाच्या लोकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. त्याप्रसंगी महावीर जयंतीनिमित्त मिरवणूकही काढण्यात आली. महावीर जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या या शोभायात्रेचे माजी सभापती विलासबापु भुमरे यांच्या हस्ते महावीर चौकातून शुभारंभ करण्यात आला. यावेळी विजय पापडीवाल, सोमनाथ परदेशी, तुषार पाटील, विलास पहाडे, पवन लोहीया, भाकरे मामा, बलराम लोळगे, राधेश्याम लोहीया, स्वदेश पांडे, उमेश तटटु, जितु पांडे, पाटणी, शिंगवी तसेच शहरातील सामाजिक संस्था व राजकीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच राजकीय नेत्यांनी पुष्पवृष्टी करून स्वागत केले. मिरवणूकत महीला व मुलांचा मोठा सहभाग होता. तसेच जैन मंदिर येथे गेल्या २७ वर्षापासून आन्नदानाची नरेंद्र बडजाते यांनी परंपरा पाळत आन्नदान केले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



# भडजी येथे 'हर घर नल से जल'चे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील भडजी येथे पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रकाश चव्हाण, दिनेश अंभोरे, भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, सरपंच बाबासाहेब वाकळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले यामध्ये एक विहिर ( 6 मिटर गोल व 25 मिटर खोल आहे.) पाण्याची टाकी 35000 लिटरची आहे. पाईपलाईन लांबी 4430 मिटर आहे. जुने सर्व कनेक्शन व नविन 46 कनेक्शन जोडणी करण्यात येणार आहे या उद्घाटन प्रसंगी सरपंच बाबासाहेब वाकळे, उपसरपंच राजु वाकळे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर गवळे, मच्छिंद्र वाकळे, गणेश घोडके, बद्रीनाथ वाकळे, गणेश वाकळे, बाबासाहेब वाकळे, सुखदेव वाकळे, सुदाम वाकळे,भाऊसाहेब वाकळे,शेख कादरभाई,भाऊराव गवळे, देवसाहेब वाकळे, विजय वाकळे, प्रवीण जंजाळ,पोलीस पाटील मच्छिंद्र वाकळे, रत्नाकर वाकळे,ग्रामसेवक सोनवणे, ठेकेदार प्रणव काकडे तसेच गावातील नागरिक उपस्थित होते.

# शिक्षिका, लेखिका, कवयित्रींना "काव्य गौरव पुरस्कार" जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** न्यायिक लढा पत्रकार सेवा संघ पुणे जिल्हा यांच्या वतीने साहित्य, कला, क्रीडा, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल१३ एप्रिल २०२३ चा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने विविध मान्यवरांना साहित्य कला गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. कवयित्री, लेखिका, शिक्षिका सोबत सामाजिक बांधिलकी जपणारे व्यक्तिमत्व, रोखठोक बोलणारी, अनिष्ट रूढी परंपरा विरुद्ध आवाज उठवणारी अशी त्यांची ओळख आहे. सामाजिक कविता, महापुरुषांच्या प्रेरणादायी कविता,निसर्ग कविता, स्त्री मनाच्या वेध घेणाऱ्या कविता, सामाजिक प्रश्न, स्त्री -पुरुष समानता, महिलांवरील संकटे, दैंनदिन घडामोडी यावरील कविता व लेख यांच्या माध्यमातून समाजात परिवर्तन करण्याचा त्यांचा मानस आहे. तसेच शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात देखील त्यांचे योगदान दिसून येते.

शाळेतील विध्यार्थी यांना खाऊ वाटप करणे, शैक्षणिक साहित्य वाटप करणे, गरीब विध्यार्थी यांना मदत करणे, पर्यावरण चळवळीत सक्रिय सहभाग याच कार्याची पावती म्हणून, न्यायिक लढा पत्रकार सेवा संस्था पुणे जिल्हा अध्यक्ष विकास गोविंदराव राऊत यांनी प्रतिमा अरुण काळे, निगडी प्राधिकरण पुणे,४४ यांच्या साहित्य, सामाजिक क्षेत्रातील कामगिरीची दखल घेऊन त्यांना "काव्य गौरव पुरस्कार" जाहीर केला आहे.



रामनवमीनिमित्त चेलिपुरा एस. पी. रोड येथील श्री बालाजी मंदिर ट्रस्ट च्यावतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही श्रीराम नवमी उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी उपस्थित जय भोले क्रीडा मंडळाचे सदस्य व बालाजी मंदिर ट्रस्टचे प्रभाताई वरे, कैलास मनिठे, किशोर दडपेसह आदी महिला ही उपस्थित होत्या.

# कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**बोडखा :** ( ता. खुलताबाद ) येथील शेतकऱ्याने त्याचे कडील कर्जबाजारीपणाला कंटाळून विषारी औषधाचे प्राशन करून मंगळवार ( ता:४ ) सकाळी आत्महत्या केल्याची घटना घडली
आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव युवराज राऊबा जेठे ( वय 55 वर्ष ) असे आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार त्याने त्याच्या निवासी घरात सकाळीच सहा वाजता विषारी औषधाचे प्राशन केल्याचे त्यांचा मुलगा जीवन जेठे यांनी पाहिल्यावर संबंधित व्यक्तीला बेशुद्ध अवस्थेत दिसून आल्याचे दृश्य समजल्यावर त्याच अवस्थेत त्यांना त्वरित उपचारासाठी म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र बाजार सावंगी येथे आणण्यात आले. या घटनेची माहिती बाजार सांगली पोलीस चौकी दिल्यावरून मुख्य जमादार नवनाथ कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार संजय सपकाळ दिलीप बनसोड प्रकाश ठोकळ हे देखील घटनास्थळी दाखल झाले
वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना तपासले व तपासणी अंति मृत घोषित केल्यावर पंचनामा करण्यात आला यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉक्टर श्रेयस वाघमारे यांनी शवविच्छेदन केले सदर व घटनेची अकस्मात मृत्यू ची नोंद करण्यात आली आहे त्यांच्या पश्चात पत्नी अविवाहित तीन मुले व एक विवाहित मुलगी असा परिवार आहे. मृतदेह ताब्यात दिल्यानंतर बोडखा त्यांची मूळ गावी तीन वाजता अंत्यसंस्कारासाठी नेण्यात आले शासकीय स्तरावरून त्यांना मदत मिळावी अशी अनेकांनी मागणी केली आहे.

# दीपक कोंडीराम डोंगरे यांना पीएचडी

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठातर्फे राज्यशास्त्र विभागातील संशोधक विद्यार्थी दिपक कोंडीराम डोंगरे यांना पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली. आंतरराष्ट्रीय दहशतवाद आणि भारत -अमेरिका बदलते संबंध :एक अभ्यास " या विषयावर राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. शुजा शाकिर यांच्या मार्गदर्शनाखाली शोध प्रबंध सादर केला.
या यशाबद्दल त्यांचे डॉ. सटाले, डॉ. आसाराम मराठे, सरपंच विलास कुशेकर, रमेश फलके,महादेव डोंगरे, नितीन क्षीरसागर, नागेश बाम्हणे, डॉ.महेश कांबळे, शरद पवार, डॉ.सुनील भारोडकर, प्रा. युवराज सुतार, अशोक तायडे, नारायण घुंगासे, विजय डोंगरे, सिद्धेश्वर डोंगरे, मनीषा डोंगरे आदी मित्र परिवारातर्फे अभिनंदन केले.

# ब्रह्मांडावर आधारित आहे इंडो-ब्रिटिश ग्लोबल स्कूलचा अभ्यासक्रम

## छत्रपती संभाजीनगर येथील इंडो-ब्रिटिश ग्लोबल स्कूलचे भव्य उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अखेर प्रतीक्षा संपली! इंडो-ब्रिटिश ग्लोबल स्कूल शहराच्या मध्यभागी आपले दरवाजे उघडण्यासाठी सज्ज आहे, मुलांना जागतिक दर्जाचे शिक्षण देते. ही शाळा लीफ फाउंडेशन आणि वैश्विक शोध यांच्यातील सहकार्य आहे. 7.5 एकर हिरवळ पसरलेली, शाळा तिच्या अनोख्या इकोलीअर इन्फिनिटी लर्निंग पध्दतीद्वारे शिकण्यासाठी सर्वांगीण दृष्टिकोन देण्याचे वचन देते. शालेय अभ्यासक्रम ब्रह्मांडवर आधारित आहे, जागतिक एकात्मतेवर लक्ष केंद्रित करून, छत्रपती संभाजीनगरमधील हा पहिलाच अभ्यासक्रम आहे, अशी माहिती एमडी शिव गिर आणि सीएक्सओ लग्नजित मोहंती यांनी हॉटेल वर्षा इन येथे आयोजित पत्रकार परिषदेत शुक्रवारी ( ता. ३१ ) दिली. यावेळी AVP किरण मुघल आणि प्रादेशिक व्यवस्थापक रोहित मदनूरकर, लीफ फाउंडेशनचे विश्वस्त गणेश शिवाजी गिरी गोसावी, अर्चना गिरी, प्रयाग अशोक गिरी, अशोक गिरी, आशिष गिरी, रेवती गिरी, शिवाजीराव गिरी गोसावी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना गिर म्हणाले की, इंडो-ब्रिटिश ग्लोबल स्कूलची रचना उच्च श्रेणीच्या शिक्षणापासून ते अभ्यासक्रमेतर आणि क्रीडा उपक्रमांपर्यंत सर्व सुविधा एकाच छताखाली पुरवण्यासाठी करण्यात आली आहे. शाळेमध्ये अत्याधुनिक पायाभूत सुविधा, जागतिक दर्जाच्या सुविधा आणि उच्च अनुभवी प्राध्यापक आहेत. हा मैलाचा दगड साजरा करण्यासाठी, वैश्विक शोध 31 मार्च ते 2 एप्रिल 2023 या कालावधीत सकाळी 9 ते रात्री 8 या वेळेत ब्रह्मांड कार्यक्रमाचे आयोजन करत आहे. हा कार्यक्रम एक अनोखा आणि माहितीपूर्ण अनुभव असल्याचे वचन देतो, ज्यामध्ये मुले आणि प्रौढ दोघांनाही आनंद होईल अशा अनेक रोमांचक क्रियाकलापांचा समावेश आहे. ब्रह्मांड इव्हेंटच्या ठळक वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे तारांगण आहे, जेथे अभ्यागतांना सूर्यमालेतून प्रवास करण्याचा आणि विश्वाचे अन्वेषण करण्याचा अनुभव घेता येईल. अभ्यागत पृथ्वीचा अनुभव घेऊ शकतात, तिच्या नैसर्गिक चमत्कारांबद्दल जाणून घेऊ शकतात आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजू शकतात.
कार्यक्रमाचे आणखी एक रोमांचक वैशिष्ट्य म्हणजे दुर्बिणी, जिथे अभ्यागत विश्वाचे सौंदर्य पाहू शकतात आणि खगोलीय पिंडांचे निरीक्षण करू शकतात. या कार्यक्रमात एक रोमांचक थीमवर आधारित आर्ट शो देखील आयोजित केला जाईल, जो कलाप्रेमींसाठी एक मेजवानी असेल. ब्रह्मांड इव्हेंट ही पालक आणि मुलांसाठी इंडो-ब्रिटिश ग्लोबल स्कूल, त्याचा अभ्यासक्रम आणि सुविधांबद्दल अधिक जाणून घेण्याची एक उत्तम संधी आहे. हा कार्यक्रम अभ्यागतांना शाळेच्या पायाभूत सुविधा, प्रयोगशाळा, वर्गखोल्या आणि क्रीडा सुविधांची झलक देईल. मुलांना जागतिक दर्जाचे शिक्षण देणे आणि त्यांना जागतिक स्तरावर तयार करणे हे शाळेचे उद्दिष्ट आहे.



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर